रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ८२
www.ramprahar.com
मंगळवार, ८ ऑक्टोबर २०२४◆पाने ८◆किंमत ₹२

## अंतरंग

देवाभाऊ जो बोलता है, वो करता है! -फडणवीस/२
वन व्यवस्थापनातून शाश्वत रोजगाराची हमी/५
कर्जतच्या मार्शल आर्ट्स खेळाडूंची निवड/८

## लाडकी बहीण योजनेचा उद्या माणगाव येथे वचनपूर्ती सोहळा

**माणगाव :** राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून देण्याकरिता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे बुधवारी (दि. ९) माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे सकाळी ११ वा. आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्यासह आमदार, खासदार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# 'दिबां'च्या नावासाठी सरकार सकारात्मक

## केंद्रीय मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांची स्पष्ट ग्वाही



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकनेते दि.बा. पाटील यांच्या आणि आपल्या संघर्षामुळे नवी मुंबई विमानतळ नामकरण लढ्याने एक वेगळी उंची गाठली आहे. या संघर्षाचा आणि आंदोलनाचा सन्मान करीत सरकार नामकरणाची प्रक्रिया पूर्ण करीत लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास 'दिबां'चे नाव जाहीर करेल, अशी स्पष्ट ग्वाही केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांनी सोमवारी (दि. ७) नवी दिल्ली येथे जाहीर केली.



केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने नामकरणासंदर्भात लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीबरोबर आयोजित केलेल्या बैठकीत केंद्रीय मंत्री नायडू बोलत होते. नामकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी तसेच या संदर्भातील सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी कृती समितीने मागणी केल्याप्रमाणे ही बैठक नवी दिल्ली येथे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या आग्रहाने आयोजित करण्यात आली होती. या वेळी समितीशी बोलताना केंद्रीय मंत्री नायडू यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले की, 'दिबां'व्यतिरिक्त इतर कोणाचेही नावाचा प्रस्ताव आमच्या मंत्रालयाला आलेला नाही. निवडणुका आणि राजकारण यांच्यापेक्षा 'दिबां'चे नाव फार मोठे आहे. त्यांच्या नावासाठी कोणाचा अडथळाही नाही. आमचे सरकार 'दिबां'च्या संघर्षाचा सन्मान करते. त्यांच्या नावासाठी आपण केलेल्या संघर्षाच्या आपल्या भावनाही आम्ही जाणतो. 'दिबां'च्या आणि आपल्या संघर्षाचा सन्मान करीत आम्ही लवकरच 'दिबां'चे नाव विमानतळाला जाहीर करू. राज्य सरकारने पाठवलेला नामकरणाचा प्रस्ताव प्रक्रियेचा भाग म्हणून मंजुरीस पाठवला आहे. याच प्रक्रियेचा भाग म्हणून पीएमओ आणि कॅबिनेटकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत मंत्रीमहोदयांनी विमानतळ सुरू होण्याआधी नामकरणाची सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून 'दिबां'चे नाव जाहीर करण्यास आम्हाला आनंद वाटेल, असे अधोरेखित केले.

या वेळी झालेल्या चर्चेत माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, खासदार श्रीरंग बारणे, खासदार धैर्यशील पाटील, समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार जगन्नाथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार राजू पाटील तसेच भूषण पाटील, जे.डी. तांडेल, संतोष केणे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला होता.

बैठकीस 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, जे.एम. म्हात्रे, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, दीपक पाटील, शरद म्हात्रे, सुशांत पाटील यांच्यासह केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिव विमलूमंग वुलनाम आणि निर्देशक नयोनिका दत्ता हेही उपस्थित होते.



## महायुती सरकारला अशीच साथ द्या -आमदार प्रशांत ठाकूर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महायुतीचे सरकार ताकदीने काम करतंय. याच पद्धतीने हेच सरकार पुढील काळातदेखील काम करत राहावे यासाठी तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाची गरज आहे, असे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे महिलांसाठी आयोजित कार्यक्रमात केले. या कार्यक्रमाला भाजपचे गोवा प्रदेश महामंत्री माजी आमदार दयानंद सोपटे यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

**खारघरमध्ये खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रम उत्साहात**

महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून या योजनेचे स्वागत केले जात आहे. याच भगिनींचे आशीर्वाद घेण्यासाठी पनवेल विधानसभा क्षेत्रातील खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून खारघर सेक्टर ५मधील खारघरचा राजा हॉलमध्ये रविवारी (दि.६) कार्यक्रम झाला. या सोहळ्यास महिलांची लक्षणीय उपस्थिती लाभली. या वेळी केतकी पुरकर यांनी पैठणी जिंकण्याचा मान पटकावला. त्यांना तसेच लकी ड्रॉमधील विजेत्या महिलांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, विस्तारक सागर मोरे, खारघर प्रभारी राजेश गायकर, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, महिला मोर्चा उत्तर रायगड सरचिटणीस संध्या शारबिद्रे, भाजप खारघर शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका आरती नवघरे, हर्षदा उपाध्याय, अनिता पाटील, नेत्रा पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष रमेश खडकर, संजय घरत, अमर उपाध्याय, शैलेंद्र त्रिपाठी, महिला मोर्चा सोशल मीडिया प्रदेश सहसंयोजिका बिना गोगरी, सहसंयोजिका श्यामला सुरेश, उत्तर रायगड सहसंयोजिका स्नेहल बोधाई, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस भाग्यश्री खरपूरीया, महिला मोर्चा उपाध्यक्ष मधुमिता जेना, सारिका जाधव, अंकिता वारंग, मंडल चिटणीस अनिता जाधव, शोभा मिश्रा, निलम विसपुते, चिटणीस मीनाक्षी अंथवाल, दुर्गादेवी, सीमा खडसे, सोशल मीडिया संयोजिका मंगल घोलप, बेटी बचाव बेटी पढाव संयोजिका प्रिया दळवी, **(पान २ वर..)**

## निवडक

### कोलकाता अत्याचार, हत्या प्रकरणात संजय रॉयच आरोपी

**कोलकाता :** येथील के आरजी कर मेडिकल कॉलेजमधील महिला डॉक्टर अत्याचार आणि हत्या प्रकरणात सीबीआयने सियालदह कोर्टात चार्जशीट दाखल केली आहे. या चार्जशीटमध्ये महिला डॉक्टरवर गँगरेप झाला नव्हता, तर आरोपी संजय रॉयनेच बलात्कार करून तिची हत्या केल्याचे नमूद करण्यात आले आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि सापडलेल्या ब्ल्यूटूथ डिव्हाईसमुळे पोलीस आरोपीपर्यंत पोहचले. सीबीआय चार्जशीटनंतर महिला डॉक्टरला न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### भाजप नेते किरीट सोमय्यांवर आता नवी जबाबदारी!

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर आता नवीन जबाबदारी सोपवली आहे. त्यांची मुंबई महानगर प्रदेशातील विधानसभा मतदारसंघांसाठी मतदाता विशेष संपर्क अभियान प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या नियुक्तीबद्दलची माहिती दिली. भाजप नेते, माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांची राज्याच्या मतदाता विशेष संपर्क अभियान प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## पनवेल महापालिकेच्या ३०२ कोटींच्या विविध विकासकामांचे आज भूमिपूजन व लोकार्पण

■ **मान्यवरांची लाभणार उपस्थिती**



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या ३०२ कोटींच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि. ८) दुपारी २ वाजल्यापासून प्रत्यक्ष स्थळांवर होईल. त्यानंतर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, तर विशेष निमंत्रित म्हणून सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे.

या वेळी नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र आसूडगाव व इतर तीन ठिकाणे, मोबाईल मेडिकल युनिट्स (फिरता दवाखाना) एकूण दोन वाहने, वळवली येथील मनपा प्राथमिक शाळा, अग्निशमन दलासाठी २२एमटीआर टीटीएल वाहन, ॲडव्हान्स्ड रेस्क्यू व्हेईकल वाहन, ॲडव्हान्स्ड फायर इंजिन वाहन; महापालिका हद्दीत पर्यावरण जनजागृती निर्माण करण्यासाठी वाहन, रामकी ग्रुपच्या सीएसआर निधीतून बहुउद्देशीय सभागृह, लोकनेते स्व. दि.बा. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, धुळीचे प्रदूषण नियंत्रित ठेवण्याकरिता एकूण चार वाहने, फिरते वातावरणीय हवा गुणवत्ता मापक केंद्र वाहन यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

याचबरोबर महापालिका हद्दीत सुरक्षिततेच्या दृष्टीने एकूण १३४३ अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांसाठी अंतिम भूखंड क्र. ५०/९ येथे प्रस्तावित गृहप्रकल्प इमारतीचे व अनुषंगिक पायाभूत सुविधांचे बांधकाम करणे, प्रभाग समिती क मधील लायन्स गार्डन ते तहसील ऑफिस ते एचओसी कॉलनीपर्यंत रस्त्यांचे क्राँकीटीकरण करणे, प्रभाग समिती अ प्रभाग क्र. १ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल बांधणे, खारघर सेक्टर १२ भूखंड क्र. १२ अ क्षेत्रफळ १४९१.०४ या ठिकाणी नव्याने दैनिक बाजार मच्छी मार्केट बांधकाम करणे, बेघरांसाठी खांदा कॉलनीत रात्र निवारा बांधकाम करणे, पनवेल शहरातील बल्लाळेश्वर मंदिर व रामेश्वर मंदिर येथे प्रवेशद्वार बांधणे व घाटाचे उन्नतीकरण करणे, मनपा हद्दीतील आडिवली तलाव पुनरूज्जीवीत करणे, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावर मिनी थिएटर बांधकाम करणे, अंतिम भूखंड क्र. ४१४मध्ये प्ले ग्राऊंड खेळाचे मैदान केंद्र विकसित करणे, सिद्धी करवले तलाव पुनरूज्जीवीत करणे या विकासकामांचे भूमिपूजन होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

## मनोरुग्णाकडून प्रवाशांवर खुनी हल्ला, दोघांचा मृत्यू

**नागपूर :** येथील रेल्वेस्थानकावर एका मनोरुग्णाने प्रवाशांवर केलेल्या हल्ल्यामुळे दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले आहेत. फलाट क्रमांकावर ७वर रात्री सव्वातीनच्या सुमारास ही घटना घडली.

जयराम रामअवतार केवट असे या आरोपीचे नाव असून तो उत्तर प्रदेशातील हैदरपूर येथील रहिवासी आहे. काही प्रवासी ट्रेनची वाट बघत होते, तर काही जण आणि भिक्षेकरी हे फलाटावर झोपले होते. त्या वेळी अचानक त्या मनोरुग्णाने लाकडी रायफटरने प्रवाशांवर हल्ला केला.

सुरुवातीला काय झाले हे कुणालाच कळाले नाही. मनोरुग्णाने रायफटरने १२ लोकांवर हल्ला केला, ज्यात दोन प्रवासी ठार झाले, तर दोन गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.






**खालापूर :** भक्ती आणि शक्तीचे प्रतिक असणारा नवरात्रोत्सव सध्या सुरू आहे. यानिमित्ताने उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी वावंढळ येथील नवरात्रोत्सवाला भेट देऊन देवीचे दर्शन घेतले.

## सुहास जोशी यांना विष्णूदास भावे पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांनी मराठी चित्रपट, दूरदर्शन, नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. त्याचसाठी त्यांना रंगभूमीवरील मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. जोशी यांना यंदाचा विष्णूदास भावे गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

येत्या ५ नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार दिला जाईल. त्याचप्रमाणे यंदा दिला जाणारा हा ५७वा गौरव पुरस्कार आहे. रोख रक्कम २५ हजारांसह स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल. सुहास जोशी यांनी आजवर अनेक सिनेमे, नाटके, मालिका यांमधून प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन केले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# देवाभाऊ जो बोलता है, वो करता है!

## ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मेळाव्यात फटाकेबाजी

**सोलापूर : प्रतिनिधी**

'देवाभाऊ जो बोलता है, वो करता है, और जो नही बोलता वो डेफिनेटली करता है..', असा सिनेस्टाईल डायलॉग म्हणत मंगळवेढ्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार डायलॉगबाजी केली.



पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात आमदार समाधान अवताडे यांनी मेळाव्याचे आयोजन सोमवारी (दि.७) केले होते. या वेळी ते बोलत होते. या वेळी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन पार पडले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर तुम्हाला दुष्काळी २४ गावांसाठी पाणी दिले. सातारा जिल्ह्यातील दुष्काळ संपवून दाखवला. सांगोला उपसा सिंचन योजनेतून संगोल्याच्या ५० हजार हेक्टर जमिनीला लाभ झालाय. आता मंगळवेढा येथील १७ हजार हेक्टर जमिनीचा फायदा होत आहे. अनेकजण मला विचारतात तुम्ही पाणी कुठून आणलं? जिद्द असेल तर पाण्याचा थेंब थेंब वाचवून पाणी उपलब्ध केले.

मी समाधान आवताडे यांच्या प्रचारासाठी आलो होतो त्या वेळी मी तुम्हाला सांगितले होते की, १०६ आमदार निवडून द्या. तुम्ही मला १०६वा आमदार दिला आणि आपले सरकार, महायुतीचं सरकार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात आणले.

तुम्ही समाधान आवताडे यांना एक मत दिले आणि त्यांनीदेखील तुमचे समाधान करून दाखवले. युतीच्या सरकारमध्ये आपण अनेक योजना सुरू केल्या. लोक म्हणायचे पाणी पोहचू शकत नाही, मात्र आपले सरकार आल्यानंतर केंद्र सरकारची मदत घेतली आणि सोलापूर सांगली आणि सातारा जिल्ह्यातील दुष्काळ हा मी भूतकाळ करून दाखवेन. आज साताऱ्यातील काही तालुक्यांना दुष्काळी तालुके म्हटले जायचे, पण आज ते तालुके दुष्काळी राहिले नाहीत. हे काम साताऱ्यात करून दाखवले आहे. तेच काम सांगलीतदेखील करून दाखवले आहे. मागच्या काही काळाच सांगोला उपसा सिंचन योजना आपण केली, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी म्हटले.

# इर्शाळवाडी येथे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम कार्यशाळा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच इर्शाळवाडी येथे भेट दिली होती. त्या वेळी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात त्यांनी पालकमंत्री रायगड तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांना निर्देश दिले होते. या सुचनेनुसार जिल्हा उद्योग केंद्र रायगडद्वारे इर्शाळवाडी येथे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम कार्यशाळा घेण्यात आली, तसेच महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.



इर्शाळवाडी येथे आयोजित या कार्यशाळेकरिता ग्रामपंचायत चौक व इरसाळवाडी येथील सुमारे ७० महिला उपस्थित होत्या. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थाक जी.एस.हरळया व अग्रणी बँकेचे व्यवस्थापक कुलकर्णी यांनी उपस्थित महिलांना योजनेविषयी सविस्तर माहिती दिली.

उपस्थित काही महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज येथे केले असून उर्वरित इच्छुक महिला ग्रामपंचायतीद्वारे जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज सादर करणार आहेत. सरपंच रितू ठोंबरे यांनी आभार मानले.

# चहाच्या टपरीतून अमली पदार्थांची विक्री; आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

उरण-पनवेल महामार्गालगत जासई येथील सुरुंगपाडा येथे चहाची टपरी चालवण्याबरोबरच अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अमली पदार्थविरोधी पथकाने छापा मारून अटक केली आहे. राजन बाळा राठोड (वय ३२) असे या गुन्हेगाराचे नाव असून पोलीस पथकाने त्याच्या चहाच्या टपरीतून २१ ग्रॅम हेरॉईन आणि एक किलो गांजा तसेच चिलीम, रिजला पेपर, गोगो, सिल्वर फॉइल पेपर असा सहा लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मुंबईतील गोवंडी येथे राहणारा सराईत गुन्हेगार उरण-पनवेल महामार्गालगत एका पत्र्याच्या बंदिस्त शेडमध्ये हेरॉईन आणि गांजा यांसारख्या अमली पदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती.

माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक निरीक्षक श्रीकांत नायडू, निलेश धुमाळ, हवालदार तायडे, गणेश पवार, कॉन्स्टेबल चालक सोनवूळ आदींच्या पथकाने जासई सुरुंगपाडा येथील चहाच्या टपरीवर छापा मारला.


दरम्यान, आरोपी राजन बाळा राठोड मुंबईतील गोवंडी भागात राहण्यास असून तो सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरोधात मुंबईतील शिवाजीनगर, देवनार तसेच पालघर या पोलीस ठाण्यात दरोडा, हत्येचा प्रयत्न, आर्म ॲक्ट, अंमली पदार्थ बाळगणे यासह इतर प्रकारचे सात गुन्हे दाखल आहेत.

# भामट्याकडून ऑनलाईन दिशाभूल | पोलिसांचे एक्सवर बनवले बनावट खाते

**पनवेल : वार्ताहर**

मागील चार वर्षांपासून एका अनोळखी भामट्याने एक्स या ॲपवर नवी मुंबई पोलीस दलाचे आणि पोलीस आयुक्तांच्या नावाचे बनावट खाते सुरू केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

नवी मुंबईत मागील दोन वर्षांत ऑनलाईन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून या चोरट्यांनी उच्चशिक्षित आणि धनिकांना आपले लक्ष्य केले आहे. कोट्यवधी रुपयांच्या ऑनलाईन चोरीचे सत्र सुरू असून दिवसाला एकतरी चोरीच्या घटना नोंद केल्या जात आहेत, मात्र या चोऱ्या रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस असमर्थ ठरले असून नवी मुंबई पोलिसांनी स्वताच नवी मुंबई पोलिसांच्या नावाने बनावट एक्स खाते सुरू केलेल्या व्यक्तीविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला.



त्यामुळे ऑनलाईन चोर हे पोलिसांवर शिरजोर झाल्याचे चित्र आहे.

नवी मुंबई पोलीस दलाचे परिवर्तन काळानुरुप आधुनिक पोलीस दलात करण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी कंबर कसली आहे. यासाठी आयुक्त भारंबे यांनी काही महाविद्यालयांमधील सायबर सुरक्षा विषयाच्या प्राध्यापकांच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शिकवणीवर्ग सुरू करण्याचा प्रयोग केला. प्रत्येक पोलीस ठाण्यात किमान दोन तरी अधिकारी आणि चार कर्मचाऱ्यांना तरी सायबर सुरक्षेचे ज्ञान असणे गरजेचे असल्याचा हा प्रयोग नवी मुंबईत पहिल्यांदा करण्यात आला. नवी मुंबई पोलीस दलाला आयुक्त भारंबे यांच्याकाळात पहिल्यांदा सायबर सेल मध्यवर्ती पोलीस ठाणे सुरू झाले. वर्षभरात या सायबर पोलीस ठाण्यातसुद्धा ऑनलाईन चोरी व अपहाराचे २२१ गुन्हे दाखल आहेत. मोठमोठ्या उद्योगपती किंवा नामांकित व्यक्तीच्या नावाने ही चोरी भामट्यांकडून केली जाते.

सायबर सुरक्षा पोलीस ठाण्यात पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये मागील चार वर्षांपासून एका अनोळखी भामट्याने एक्स या ॲपवर नवी मुंबई पोलीस दलाचे आणि पोलीस आयुक्तांच्या नावाचे बनावट खाते सुरू केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले, तसेच या भामट्याने इन्स्टाग्रामवरसुद्धा नवी मुंबई पोलीस दलाच्या नावाने बनावट खाते सुरू केले आहे.

पोलिसांच्या सायबर सुरक्षा विभाग नियमितपणे समाजमाध्यमांवरील विविध संकेतस्थळ आणि विविध समाजमाध्यमांच्या ॲपवर पोलिसांच्या नावाने नागरिकांना फसविण्यासाठी अशी बनावट खाती सुरू आहे का, याचा मागोवा घेत असतात. याच मागोवा घेत असताना पोलिसांच्या सायबर विभागाला संबंधित खाती आढळल्याने पोलिसांनी स्वत:हून या प्रकरणी गुन्हा नोंदविला.

या खात्यावर कोणत्याही नागरिकाची फसवणूक झाल्याची तक्रार पोलिसांकडे कोणी केली नव्हती, अशी माहिती सायबर सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दिली.

# नवरात्रीनिमित्त न्हावे येथे नृत्य स्पर्धा रंगली

## भाजप युवा मोर्चा मिलिंद झुरे यांचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील न्हावे येथे युवा मोर्चा तालुका सरचिटणीस मिलिंद झुरे यांच्या माध्यमातून शिवबा प्रतिष्ठान व मित्र मंडळ परिवार यांच्या वतीने गरबा डान्स स्पर्धा शनिवारी आयोजित करण्यात आली होती.



यामध्ये उत्कृष्ट वेशभूषा तसेच आकर्षक डान्स असे जवळजवळ १०० वैयक्तिक पारितोषिक स्पर्धकांना देण्यात आले. ग्रुप डान्स प्रथम कोळी ग्रुप, द्वितीय मरुआई मित्र मंडळ, तृतीय रोशन साळावकर ग्रुप, ग्रुप डान्स (मुले व मुली) प्रथम साऊथ इंडीयन, द्वितीय बैलगाडा पंढरी शेठ फडके, तृतीय स्टार ग्रुप भायतांडेल आळी, वेशभूषा स्पर्धा मोठा ग्रुप प्रथम महादेव भालेकर, द्वितीय रेखा भालेकर, तृतीय श्रेया न्हावकर यांना पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग, दक्षिण रायगड युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, सरपंच न्हावे नितीन डबीर, उपसरपंच न्हावे पांडुरंग कासकर, गैणीनाथ कटोरे, भगवान झुरे, मनोज भायतांडेल, संकेश सर्लेकर उपस्थित होते.

# उलवेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात मेहंदी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या मेहंदी स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी स्वतः मेहंदीचे कोन आणले होते. जवळजवळ २५ विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी या स्पर्धेचे नियोजन केले होते. विद्यार्थ्यांनी काढलेल्या मेहंदीचे विद्यार्थ्यांच्या मातांकडून परीक्षण करण्यात आले व उत्कृष्ट अशा तीन स्पर्धकांची निवड करण्यात आली.

यामध्ये खुशी मौर्या प्रथम, दिव्या सूर्यवंशी द्वितीय, जैनब चौधरी तृतीय क्रमांक असे तीन क्रमांक काढण्यात आले. या वेळी विद्यालयातील उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे, पल्लवी पवार, आशा कसपटे, विशाखा गावंड यांच्याबरोबर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर सहभागी झाल्या होत्या.

# कर्जतमध्ये पोल्ट्री फार्म रजिस्ट्रेशन आणि नोंदणी मोहीम



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोल्ट्री फार्म व्यवसायिक आणि उत्पादकांसाठी पशुसंवर्धन विभाग कर्जत यांच्यामार्फत नोंदणी प्रक्रियेबाबत शिबिर घेण्यात आले.

पोल्ट्री उत्पादक आणि पशुपालकांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन कर्जत डॉ. गिरीश बारडकर, पं. स. पशुधन विकास अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, पशुसंवर्धन विभाग डॉ. सुवर्णलता मनगुळी, डॉ. आसाराम काळे, सूर्यपंखा पारखे, गणेश निरगुडा आदी अधिकारी वर्ग उपस्थित होता. या विशेष मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून, सहा. आयुक्त पशुसंवर्धन कर्जत डॉ. गिरीश बारडकर यांनी कर्जत तालुक्यातील ३००० कुक्कुटपक्षीपेक्षा जास्त क्षमतेचे सर्व पोल्ट्री फार्मधारकांना, विहीत नमुन्यातील अर्ज भरून पोल्ट्री फार्म नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन ही केलेले आहे.

कर्जत तालुक्यातील कुक्कुटपालक, पोल्ट्री फॉर्मधारक यांना पोल्ट्री फार्म नोंदणी प्रक्रिया, त्याचे महत्त्व, कुक्कुटपालन, पोल्ट्री फीड, कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगबाबत शासन निर्णय, इतर संबंधित अपडेटवर सविस्तर मार्गदर्शन केले आहे. या शिबिरात कर्जत तालुक्यातील कुक्कुटपालक दिपक भगत, अनिल शेमटे, विलास मोडक, दाजी पारधी, प्रतिक घरत, हनुमंत पाटील, किरण पाटील तसेच अन्य पोल्ट्री उत्पादक उपस्थित होते.

पान १ वरुन

## महायुती सरकारला अशीच साथ द्या -आमदार प्रशांत ठाकूर

राजस्थान सेल संयोजिका सुशीला शर्मा, प्रभाग अध्यक्ष सोनल लाहा, सीमा खडकर, नेहा यादव, वॉर्ड उपाध्यक्ष जुमा चक्रवर्ती, गायत्री महापात्रा, सोमा विश्वास, माया सिंग, गायत्री दुबे, सीमा मजुमदार, मनीषा तळवडकर, नंदा पानसरे, कावेरी डोळस, नूतन डांगळे, सुनीता देशमुख, ममता आचरेकर, चिटणीस नूतन सिंग, विद्या येवले, शोभा लवटे, संध्या पटेल, निर्मला यादव, सुशीला शर्मा, धनश्री भोईर, स्मिता आचार्य, सरचिटणीस अक्षय लोखंडे, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हातगे, दीपक ठाकूर, यश पवार, हार्दिक पटेल, प्रथम पाटील, सार्थक दोरुगडे, ध्रुव गजरा, सुनील कटके, रोशन रॉय, किरण रावडे, बंटी ढाकसे आदी पदाधिकारी, कायकर्ते उपस्थित होते.

# रोह्यात नेत्रतपासणी शिबिरात १२९ जणांची तपासणी

## ६१ मोतीबिंदू रुग्णांचे पनवेल येथे ऑपरेशन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी (दि.७) १२९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६१ रुग्णांना आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट सातत्याने 'अंधत्वाकडून दृष्टीकडे' हे मोतीबिंदूमुक्त रोहा अभियान राबवत आहे. येथील शासकीय विश्रामगृहात शिबिर झाले. या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटपदेखील करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉक्टर तसेच सहकाऱ्यांच्या टीमने रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, संतोष खटावकर, दिनेश जाधव, दिनेश मोहिते, इल्याज डबीर, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, बिलाल मोरबेकर, उस्मान रोहेकर, अहमद दर्जी, राजेश काफरे, निलेश शिर्के, अमोल देशमुख, परशुराम चव्हाण, प्रशांत देशमुख आदींनी परिश्रम घेतले. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.



# पुनाडे धरणातून गढूळ पाणीपुरवठा

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील पूर्व विभागात गढूळ पाणीपुरवठ्याने उरण पूर्व विभागातील रहिवासी हैराण झाले आहेत. एकीकडे पावसाळ्याचे दिवस आता संपले असून, ऋतुमानात बदल होत असल्याने रोगराईला निमंत्रण मिळत आहे. त्यात गढूळ पाणीपुरवठ्यामुळे रोगराई पसरण्यास मदत होण्याची भीती रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

पुनाडे धरणातून, पुनाडे, वशेणी सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, कडापे व पाणदिवे गावांना पाणीपुरवठा केला जातो. मागील काही दिवसांपासून गढूळ पाण्याचा पुरवठा अधिकच दूषित पद्धतीने होऊ लागला. यामध्ये मातकट रंगाचे पाणी येण्याच्या तक्रारी समोर येत आहेत. पुनाडे धरणातील फिल्टर खराब असून त्याची दुरूस्ती न झाल्याने गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे बहुसंख्य नागरिक बाटलीबंद विकत घेत आहेत. आठ गाव पाणी कमिटीच्या अध्यक्ष अनामिका म्हात्रे यांच्याशी यासंदर्भात संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

रोगराईला आमंत्रण



**आमच्या विभागात गढूळ पाणी येत आहे. हे पाणी आम्ही पिण्यास वापरू शकत नाही. त्यामुळे बाटलीबंद पाणी पिण्यासाठी विकत घेत आहोत. गढूळ पाण्याने रोगराई पसरण्याची भीती आहेच. लवकरात लवकर उपाययोजना करावी.**
**-प्रभाकर भोईर, सारडे, ग्रामस्थ**

# पनवेलमधील श्री स्वामी समर्थ मठात स्वामी स्कंदमातेच्या रूपात

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील गावदेवीपाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ येथे शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त स्वामींना दररोज वेगवेगळ्या रुपात साकारण्यात येते.

पाचव्या दिवसानिमित्त सोमवारी श्री स्वामी हे स्कंदमाता रुपात साकारण्यात आले होते. यासाठी विशेष सजावट स्वामी सेवकांनी केली असून दररोज वेगवेगळ्या रुपात स्वामी साकारले जात असल्याने स्वामीभक्तांना एक वेगळ्याच मातेचे दर्शन येथे दररोज होत असते.




## दुखवटा



### मधुकर भोनकर

**माणगाव :** माजी ग्रामपंचायत सदस्य मधुकर चंद्रकांत भोनकर यांचे सोमवारी (दि.७) दुपारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, जावई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने भोनकर कुटुंबियांबरोबरच, मित्रपरिवार व माणगावकरांवर शोककळा पसरली आहे. कै. मधुकर भोनकर यांनी माणगाव ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून पाच वर्षे चांगली कामे करून विकास साधण्याचा प्रयत्न केला. गेली काही महिन्यांपासून ते आजारी होते. सोमवारी माणगाव येथे त्यांना देवाज्ञा झाली.

सत्यमेव जयते
भारत सरकार

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री



श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

राज्यातील
२४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन
योजनांच्या (९०५ MW) सौर ऊर्जीकरण प्रकल्पांचे भूमिपूजन
आणि पायाभूत विद्युत सुविधांच्या रू. २७७३ कोटींच्या
सक्षमीकरण व विस्तारीकरण कामांचा शुभारंभ

राज्यातील उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण

- शासनाकडून ३३६६ कोटी रूपयांचे अनुदान
- राज्यातील २४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्यां सौर ऊर्जीकरणातून ९०५ MW ची वीजनिर्मिती
- सौर प्रकल्प उभारणीची कामे दोन वर्षात पुर्ण होणार

शुभहस्ते
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री
मा.ना.श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रमुख उपस्थिती
मा.ना.श्री.चंद्रकांत पाटील
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य तथा पालकमंत्री, सोलापूर जिल्हा
मा.ना.कु. अदिती तटकरे
मंत्री, महिला व बाल विकास

RDSS व AIIB निधीतून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पायाभूत विद्युत सुविधांचे सक्षमीकरण व विस्तारीकरण

- पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील पायाभूत विद्युत सुविधा सक्षमीकरणाच्या रू. २७७३ कोटींच्या कामांचा प्रारंभ
- १५० उपकेंद्रे व ३१३८ किलोमीटरची नवीन विद्युत वाहिनी उभारणी व ४३४१ एमव्हीए क्षमतावृध्दी

मंगळवार दि. ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वा.
स्थळ- होम मैदान, हरिभाई देवकरण प्रशाला समोर, सोलापूर





देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री







## संपादकीय

# हिंदूंना एकजुटीचे आवाहन

भारत हे हिंदू राष्ट्र आहे असे ठाम प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले असून हिंदू समाजाने भाषा, जात आणि प्रादेशिक भेद दूर सारून आपल्या सुरक्षेसाठी एकत्र यावे असे आवाहनही त्यांनी रविवारी राजस्थानातील एका कार्यक्रमात केले. या आवाहनामागची सद्यस्थिती लक्षात घेण्याची गरज आहे.

**स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवणारे काँग्रेस पक्षासारखे पक्ष प्रत्यक्षात अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण करत आले आहेत हे भारतीय जनता पक्षाने देशभरातील हिंदूंच्या लक्षात आणून दिले आहे. यावर्षीच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये जिथे जिथे मुस्लिम मते निर्णायक होती, तिथे तिथे भाजपच्या उमेदवारांचा निसटत्या मतांनी पराभव झाल्याचे चित्रही स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील १४ मतदारसंघांमध्ये अशा तऱ्हेने मुस्लिमांनी एकजुटीने भाजपविरोधात मतदान केल्यामुळे हिंदुत्ववाद्यांना पराभूत करू शकतो असा आत्मविश्वास काही लोकांमध्ये आला आहे असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील अलीकडेच म्हटले होते. या प्रकाराकडे लक्ष वेधून त्यांनी, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो आहे असा इशाराही दिला. सूज्ञ जनतेला त्यांना काय म्हणावयाचे आहे हे निश्चितच कळले असेल. काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्षतेच्या नावावर हिंदूमध्ये जातीपातींवरून फूट पाडण्याचे काम करीत आला आहे आणि आजही तेच सुरू आहे असे दिसते. अलीकडेच विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्या कोल्हापुरातील भाषणाचा रोखही पूर्णपणे आरक्षण व जातीय जनगणना याच विषयांभोवती फिरत होता. निवडणुकांच्या तोंडावर राहुल गांधी सध्या जातीजातींत फूट पाडण्याचे काम करीत असून त्याचवेळी मुस्लिमांमध्ये मात्र ते मतांसाठी ध्रुवीकरण घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत. केवळ राज्यात सत्ता मिळवण्यासाठी हे कारस्थान सुरू आहे. त्यामुळेच अचानक काँग्रेसला आता छत्रपती शिवाजी महाराजांचीही आठवण झालेली दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रातील शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन करण्यात आले होते. हे स्मारक अद्याप का होऊ शकलेले नाही असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी आता विचारला आहे. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनीही लागलीच त्यावरून महायुती सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला, परंतु उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सडेतोड उत्तर दिले. अरबी समुद्रात शिवस्मारक झाले पाहिजे ही तमाम शिवभक्तांची इच्छा आहे. मात्र यासंदर्भात प्रश्न विचारताना या स्मारकाच्या विरोधात न्यायालयामध्ये जाऊन स्थगिती आणणारे कोण आहेत, त्यांचा काँग्रेसशी काय संबंध आहे हे प्रश्न विचारणाऱ्यांनी तपासले पाहिजे. याबाबतची माहिती राज्यातील शिवप्रेमी जनतेपर्यंत जायला हवी. प्रकल्पाच्या जागी कोणतेही काम करू नये असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने ज्यांच्या याचिकेवरून दिला ते कुणाचे वकील आहेत असा नेमका प्रश्नही फडणवीस यांनी विचारला. आपण न्यायालयीन लढाई लढून हे स्मारक न्यायालयाकडून मंजूर करवून घेऊच अशी ग्वाहीही त्यांनी दिली. राज्यात निवडणुका तोंडावर आल्याने सगळ्यांनाच आता अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे स्मरण झाले आहे. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची उभारणी केली होती हे मात्र ही मंडळी सोयीस्करपणे विसरतात. हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी त्यांनी १८ पगड जातींना एकत्र केले होते. भाषा, जात, प्रादेशिक वादातील मतभेद दूर सारत आपल्या सुरक्षेसाठी हिंदूंनी एकत्र यावे हा सरसंघचालक मोहन भागवतांचा ताजा संदेशही तेच सांगतो हे लक्षात घेण्याची गरज आहे.**

# अन् माणगावमधील महिलांच्या चेहऱ्यावर फुलले स्मितहास्य

**खबरबात**
**सलीम शेख**



राज्यातील महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै महिन्यात सुरू करून याच महिन्यापासून पात्र लाभार्थी २१ ते ६५ वयोगटातील एका कुटुंबातील दोन महिलांना त्या योजनेचा लाभ मिळेल अशी घोषणा केली. या योजनेची घोषणा सरकारने करून अंमलबजावणीला सुरुवात केल्यावर योजनेचे लाभार्थी होण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे काढण्यासाठी माणगाव तहसील कार्यालयात सेतू केंद्रावर, सायबर कॅफेत महिलांची गर्दी झाली.

या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना मिळावा याकरिता सरकारने पिवळे व केशरी रेशनकार्ड असणाऱ्या कार्डधारकांना उत्पन्नाच्या दाखल्यापासून सूट दिली. त्यामुळे महिला आणखीनच आनंदी झाल्या. सरकारने याकरिता तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली अंगणवाडी सेविका, मदतनीस, अशा वर्कर यांनाही कामाला लावले तसेच मोबाईल ॲप वरूनही महिला अर्ज भरू लागल्या. त्यानंतर ऑनलाईन अर्ज भरताना महिलांना त्रास होऊ नये याकरिता राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या सूचनेनुसार ऑफलाईन अर्ज देखील स्वीकारण्यास सुरवात झाली.

माणगावात मंत्री आदिती तटकरे यांच्या सूचनेने गांधी मेमोरियल हॉल याठिकाणी तीन दिवस या योजनेचे अर्ज कसे भरावे, कोणाला भेटावे, कोणकोणती कागदपत्रे, दाखले सादर करावीत याबाबत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या या शिबिराचा तालुक्यातील महिलांनी लाभ घेतला. या योजनेत माणगाव तालुक्यातून एकूण ३९ हजार ७४३ महिलांनी ऑनलाईन अर्ज भरले. यापैकी ३९ हजार ३६७ इतक्या महिलांचे अर्ज मंजूर होऊन २९९ महिलांचे अर्ज काही कागदपत्रे,दाखले यांची पूर्तता पूर्ण न केल्याने व ७७ महिलांचे अर्ज रद्दबातल ठरवण्यात आले. या योजनेत सरकारने ठरवून दिलेल्या कागतपत्रांची,दाखल्यांची महिलांनी पूर्तता केल्यास अशा सर्व महिलांना लाभ या योजनेचा मिळणार आहे.

जुलै महिन्यात अर्ज भरलेल्या तालुक्यातील महिलांच्या खात्यावर रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला जुलै व ऑगस्ट अशा दोन महिन्याचे एकत्रित ३००० रुपये जमा झाल्याने तालुक्यातील महिलांच्या चेहऱ्यावर हसू फुलून त्यांचा आनंद व्दिगुणित झाला. माणगावमधील विविध बँकांमध्ये पैसे काढण्यासाठी महिलांची दररोज गर्दी होऊ लागली. माणगाव शहरातील लाभार्थी महिला सुप्रिया संतोष शिंदे यांनी आपल्या मनोगतात या योजनेबाबत बोलताना सांगितले की, महिला सशक्तीकरण खऱ्या अर्थाने सार्थक करणारी योजना म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यापूर्वी अनेक योजना शासनाने महिला सशक्तीकरणासाठी राबविल्या. परंतु शासनाकडून थेट आपल्या बहिणींकडे घरोघरी पोहचणारी हि एकमेव योजना आहे. ज्यावेळी आपल्या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना विधिमंडळात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. त्यावेळी महाराष्ट्रातील लाखो गृहिणींना त्यांच्या गृहकामाच्या कष्टाची नोंद कुठेतरी घेतली जात आहे अशी आशा वाटू लागली आणि जुलै महिन्यात अर्ज केलेल्या पात्र लाभार्थी महिलांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांचे एकत्रित ३००० रुपये रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बहिणींच्या खात्यात जमा झाल्याने मुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाचा वाण भेट दिल्याचा आनंद, समाधान, स्मितहास्य माझ्यासारख्या अनेक महिलांच्या चेहऱ्यावर पहायला मिळाले.

इतक्या त्वरित या योजनेची अंमलबजावणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्याबद्दल महाराष्ट्राच्या समस्त लाडक्या बहिणींकडून मुख्यमंत्र्यांना खूप खूप धन्यवाद. सध्याच्या काळात घर सांभाळणारी कुटुंबासाठी राबणारी आणि सर्वांची काळजी घेणाऱ्या या गृहणींचा सन्मानच आहे. आपल्या कामाची पोचपावती म्हणून या योजनेचे पैसे तिला मानसिक व आर्थिक समाधान मिळवून देतात. आपले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे व सरकार यांचे सर्व गृहिणींकडून पुन्हा एकदा खूप खूप आभार तसेच पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. हि योजना सर्वत्र लोकप्रिय झाली असून महिलांमध्ये प्रचंड उत्साह दिसत आहे.

सरकारने या योजनेच्या माध्यमांतून महिलांना दरमहा दिलेले १५०० रुपये याचे मोल गरीब,दीनदुबळ्या,सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी फार मोठे आहे. ज्यांच्याकडे आहे त्यांना याचे महत्व समजणार नाही मात्र गरीब वर्गातील महिलांना आपल्या कुटुंबाचा गाडा चालविताना जी कसरत करावी लागते त्यांच्यासाठी नक्कीच हे मोल महत्त्वाचे आहे.

# जाणून घ्या वायुसेना दिनाचे महत्त्व आणि इतिहास

आज भारतीय वायुसेना स्थापना दिन साजरा होणार आहे. इंडियन एअर फोर्स ॲक्ट द्वारे ८ ऑक्टोबर १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना झाली. आजचा दिवस वायुसेना गाजियाबादच्या हिंडन एयरबेसमध्ये साजरा करतात.

वायुसेना दिनी भारतीय वायुसेनाचे चिफ आणि तीन सशस्त्र सेनांचे वरिष्ठ अधिकारी देखील सामिल होतात. देशाच्या वायुसीमेच्या सुरक्षेची जबाबदारी भारतीय वायुसेनेच्या जवानांच्या खांद्यावर असते. आजच्या दिवशी वायुसेनेचे पायलट हे वायुसेनेच्या वेगवेगळ्या विमानांचा एअर शो करतात.

आज हिंडन एअरबेसवर देशाच्या जुन्या आणि आत्याधुनिक विमानांच्यासोबत भारतीय वायुसेनेचे जवान चित्तथरारक एअर शो करतात. वायुसेनेबद्दल लोकांना माहिती देणे आणि देशाच्या हवाई सीमांच्या सुरक्षेसाठी भारतीय हवाई दलाचे कार्य दर्शवणे हे वायुसेना दिवस साजरा करण्यामागचे कारण आहे. भारतीय वायुसेना दिवसाची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ मध्ये झाली. त्यावेळी भारतीय वायुसेनेचे नाव 'रॉयल इंडियन एयर फोर्स' असे ठेवण्यात आले होते. त्यानंतर देश स्वतंत्र्य झाल्यावर नावामधील रॉयल हा शब्द काढून 'इंडियन एयर फोर्स' असे नाव ठेवण्यात आले.



असे मानले जाते की १ एप्रिल १९३३ मध्ये भारतीय वायुसेनेच्या पहिल्या पथकाची निर्मिती झाली. ज्यामध्ये ६आरएफ-ट्रेंड ऑफिसर आणि १९ जवान सामिल होते. तसेच दुसऱ्या विश्व युद्धाच्या दरम्यान भारतीय वायुसेनेने महत्वपूर्ण भूमिका साकारली. देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय वायुसेनेने एकूण ५ युद्धांमध्ये सहभाग घेतला. यामधील ४ युद्ध ही पाकिस्तानसोबत तर १ चिनसोबत होते. तसेच वायुसेना महत्वाच्या ऑपरेशन्समध्ये देखील भाग घेते. ज्यामध्ये ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन कॅक्टस आणि बालाकोट एयर स्ट्राइक यांचा समावेश होतो.

भारतीय वायुसेना दिन हा दरवर्षी अनेक देश त्यांच्या सशस्त्र दलांसह साजरा करतात. राष्ट्रीय सुरक्षा आणि अधिकार बळकट करण्याच्या प्रयत्नात भारतीय हवाई दल बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी भारत ८ ऑक्टोबर रोजी वायुसेना दिन साजरा करतो.

भारतीय हवाई दल हे जगातील चौथ्या क्रमांकाचे हवाई दल आहे. गाझियाबाद, यूपी येथे असलेले हिंडन एअर फोर्स स्टेशन आशियातील सर्वांत मोठे आहे. जेव्हापासून ते अस्तित्वात आले तेव्हापासून, ख-ऋ त्यांच्या 'नभ स्पृशम दीपतम' या ब्रीदवाक्यानुसार जगत आहे. त्याचा अर्थ 'अभिमानाने आकाशाला स्पर्श करणे' असा आहे. त्याचे रंग निळे, आकाश निळे आणि पांढरे आहेत. हे भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायातून घेण्यात आले आहे, ज्यात कुरुक्षेत्राच्या रणांगणावर भगवान कृष्णाने दिलेले प्रवचन आहे. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# 'ट्राय'कडून १८ लाखांहून अधिक मोबाईल नंबर ब्लॉक

फेक कॉल आणि मेसेजला आळा घालण्यासाठी ट्रायने १ ऑक्टोबरपासून नवीन नियम लागू केले आहेत.




आता यूजर्सना येणारे फेक कॉल्स आणि मेसेज ऑपरेटर स्तरावरच ब्लॉक केले जातील. ट्रायने घोटाळेबाजांना पुन्हा एकदा जोरदार झटका दिला असून गेल्या ४५ दिवसांत १८ लाखांहून अधिक मोबाईल नंबर्स आणि ६८० एंटिटीज (संस्थांना) ब्लॉक केल्या आहेत.

**एक कोटींहून अधिक मोबाईल नंबर्स बंद**

याआधीही ट्रायने घोटाळ्यात सहभागी झाल्यामुळे लाखो मोबाईल नंबर्स ब्लॉक केले होते. आतापर्यंत, ट्रायने १ कोटींहून अधिक मोबाईल नंबर्सवर कारवाई करून त्यांची सेवा बंद केली आहे. गेल्या महिन्यातही ट्रायने कठोर भूमिका घेत ३.५ लाख मोबाईल क्रमांक ब्लॉक केले होते. दूरसंचार विभाग आणि ट्राय युजर्सना स्पॅम फ्री सर्व्हिस क्वालिटी देण्यासाठी दीर्घकाळापासून प्रयत्नशील आहे. ट्रायने टेलिकॉम ऑपरेटर्सना बल्क कनेक्शन, रोबोटिक कॉल्स आणि प्री-रेकॉर्डेड कॉल्स ब्लॉक करण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत. सप्टेंबरमध्येही ट्रायने ३.५ लाख अनव्हेरिफाइड एसएमएस हेडर आणि १२ लाख कॉन्टेंट टेम्पलेट ब्लॉक केले होते.

**'ट्राय'चा नवीन नियम**

१ ऑक्टोबरपासून लागू झालेल्या नियमात, ट्रायने नेटवर्क ऑपरेटरना टेक्नॉलॉजीटा वापर करून URL, APK लिंक, जद्ध लिंक असलेले मेसेज ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत. युजर्सला कोणतेही URL असलेले कोणतेही मेसेज प्राप्त होणार नाहीत. युजर्सना केवळ व्हाइटलिस्टमध्ये असलेल्या संस्था आणि टेलिमार्केटरकडून लिंक असलेले मेसेज प्राप्त होतील. तसेच, ट्रायने सुचविलेल्या मेसेज टेम्प्लेटवर आधारित णठङ किंवा जद्धझ सारखी इतर संवेदनशील माहिती असलेले मेसेज व्हाइटलिस्ट करण्यात टेलिमार्केटर सक्षम असतील. युजर्सना व्हाइटलिस्टमध्ये नसलेल्या संस्था किंवा टेलिमार्केटरकडून मार्केटिंग करणारे कॉल येणार नाहीत.

**...तर तुमचे सिम होऊ शकते ब्लॉक?**

ट्रायचा हा नियम सर्व मोबाइल नंबरवर लागू होतो, ज्याद्वारे मार्केटिंग कॉल केले जातात. तुम्ही तुमच्या वैयक्तिक नंबरवरून मार्केटिंग किंवा कोणत्याही प्रकारचे प्रमोशनल कॉल करत असल्यास ट्राय तुमचे सिम ब्लॉक करू शकते. मार्केटिंग कॉल करण्यासाठी, मोठ्या प्रमाणात कनेक्शन घ्यावे लागेल, ज्यासाठी ट्रायने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

# स्वातंत्र्यसैनिक गोदावरी परुळेकर

**निमित्त**



गोदावरी शामराव परुळेकर यांचा स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९०८ रोजी झाला. या भारतीय स्वातंत्र्यसैनिक, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या व लेखिका होत्या. गोदावरी परुळेकर ह्यांचे वडील ख्यातनाम वकील होते.

प्रसिद्ध वकील असलेल्या वडिलांनी आपल्या या लेकीला वैचारिक स्वातंत्र्य दिले तसेच कृती करण्यासाठी पाठबळही पुरवले. त्यांच्या घरात आधुनिक वातावरण होते. बी.ए. एलएल.बी. झालेल्या गोदावरीबाई कामगार चळवळीत सामील झाल्या. याच काळात साम्यवादी कार्यकर्ते शामराव परुळेकर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. त्यानंतर त्यांना कामगारांच्या विविध प्रश्नांची माहिती झाली. दुसर्या महायुद्धाच्या काळात त्यांना वरचेवर तुरुंगवासात दिवस काढावे लागले. युद्ध संपल्यानंतर त्या वारली शेतकर्यांशी जोडल्या गेल्या. त्या शेतकर्यांची वेठबिगारीत दखल घेतली जात नव्हती आणि समाजात त्यांना प्रतिष्ठाही नव्हती. त्यांची सामाजिक उन्नती व्हावी यासाठी वारली शेतकर्यांच्या संघर्षाचा त्या एक भाग बनल्या.

१९१२ मध्ये ना.म. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी परुळेकर यांनी मानद साहाय्यक सचिव म्हणून कामगारांच्या शिक्षणप्रसाराच्या कामात मोलाची भूमिका पार पाडली. गिरगावपासून परळपर्यंतच्या भागात ठिकठिकाणी नागरिकांना वर्तमानपत्रे वाचण्यासाठी केंद्रे सुरू केली. त्यामुळे लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली व त्यांना शिक्षणाची गरज वाटू लागली. याच सुमारास १९१७ मध्ये चिंचपोकळी येथे वाचनालय सुरू केले. त्यावेळी त्यांची ११ मोफत ग्रंथालये व १० मोफत वाचनालये मोफत चालू होती. १९४५च्या सुमारास महाराष्ट्र प्रांतिक सभेच्या कामानिमित्त परुळेकर दांपत्य ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वस्तीच्या डहाणू, तलासरी गावात फिरत असताना तेथील आदिवासींचे गुलामगिरीचे भीषण जीवन पाहून तेथेच काम करायचे त्यांनी ठरवले.

त्यांच्याबरोबर काम करताना त्यांच्या शोषणाविरुद्ध सावकार, जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारताना आलेले अनुभव या लढ्याची कहाणी, 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात गोदावरीबाईंनी चित्रबद्ध केली. 'जेव्हा माणूस जागा होतो' या समाजशास्त्रीय ग्रंथातून त्यांनी जमीनदारांकडे पिढ्यानपिढ्या वेठबिगारीने काम करणार्या आदिवासी स्त्री पुरुषांचे केलेले भयानक चित्रण अंगावर शहारे आणणारे आहे. आदिवासी समाजाला आपल्या हक्काची जाणीव करून दिल्यावर, माणूस कसा जागा झाला यावर हा ग्रंथ बेतलेला आहे. यातील 'वेठबिगारी गाडून टाकली' या प्रकरणातून आदिवासींच्या कोंडलेल्या भावना जागृत होऊन त्यांच्यात नवचैतन्य कसे निर्माण झाले याचे वर्णन केले आहे.

गोदावरीताईंनी वारली समाजातील स्त्रियांवर होणारे अत्याचार पहिले. स्त्रियांवरील या अत्याचाराविरुद्ध लढण्याचा निर्णय गोदावरीताईंनी घेतला, परंतु स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याच्या कामात त्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. कारण त्यांच्या लक्षात आले की, वारली आदिवासींच्या कल्पना, आदर्श कृती यामध्ये सुधारणा घडवून आणण्यास शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही. तेव्हा त्यांच्या शिक्षणासाठीच काम करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी त्यांना लढण्याचे बळही गोदावरीताईंनी दिले. त्यासाठी राजकारणाचे प्राथमिक धडेही त्यांनी शिकवले. या पुस्तकातून प्रेरणा घेऊन अनेक कार्यकर्ते तयार झाले. गोदावरीताईंनी ८ ऑक्टोबर १९९६ रोजी या जगाचा निरोप घेतला.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**माथेरान : पावसाळा सरत आला असताना निसर्गरम्य माथेरानचे सौंदर्य अधिकच खुलू लागले आहे. येथील डोंगरांना नवा साज चढला आहे. निसर्गाची ही किमया येथे येणाऱ्या पर्यटकांना सध्या पहावयास मिळत आहे.** (छाया : संतोष खाडे)

## आरोग्य प्रहर

# 'ही' चूक डोकं व मानेच्या कॅन्सरला देऊ शकते आमंत्रण

तुमची सकाळची एक चुक डोकं आणि मानेचा कॅन्सरला आमंत्रण देऊ शकते. नवीन अभ्यासात असे आढळले आहे की दररोज ब्रश करणारे आणि फ्लॉसिंग करणारे तसेच तोंडाचे आरोग्य नीट राखणाऱ्यांना कॅन्सरचा धोका कमी होतो. अमेरिकन संशोधकांच्या मते तोंडाची स्वच्छता न केल्याने केवळ डायबिटीज आणि हायब्लड प्रेशर वाढवत नाही तर डोक्याचा आणि मानेचा कॅन्सरला आमंत्रण मिळू शकते. त्यामुळे ओरल हेल्थबद्दल कोणतीही हलगर्जी महागात पडू शकते.



एका अभ्यासात कॅन्सरचा धोका आणि तोंडातील काही बॅक्टेरियात काही तर कनेक्शन असल्याचे उघडकीस आले आहे. NYU लँगोन हेल्थ आणि त्याच्या पर्लमटर कॅन्सर सेंटरच्या संशोधकांच्या नेतृत्वाखाली अभ्यास झाला. त्यात आढळले की तोंडात असलेल्या शेकडो बॅक्टेरीया पैकी एक डझनाहून अधिक प्रकारचे बॅक्टेरिया डोकं आणि मानेच्या स्क्वैमस सेल ग्रोथ पन्नास टक्क्यांहून अधिक वाढवते. तसेच काही अभ्यासात आढळले की काही बॅक्टेरियांना कॅन्सरशी जोडले गेले आहे. शरीरात दिवसभर दुखत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करु नका. ते तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक असू शकते.

JAMA ऑन्कोलॉजी मॅगझिनमध्ये यासंदर्भात एक अभ्यास प्रकाशित झाला आहे. यात हेल्दी पुरुष आणि महिलांच्या ओरल जर्म्सच्या जेनेटिक स्ट्रक्चरला अभ्यासले गेले. तोंडात नियमित आढळणाऱ्या शेकडो वेगवेगळ्या बॅक्टेरिया पैकी १३ प्रजातींना HNSCC ची जोखीम वाढविणे किंवा कमी करण्यास जबाबदार ठरविले आहे. या गटात कॅन्सरची शक्यता ३० टक्के अधिक आहे. हिरड्यांच्या आजारात नेहमी आढळणारे पाच अन्य प्रजातींच्या कॉम्बिनेशनमध्ये जोखीम ५० टक्के वाढली होती.

हे बॅक्टेरिया बायोमार्कर म्हणून काम करू शकतात. ज्यामुळे हाय रिस्कची ओळख केली जाऊ शकते. आधीच्या संशोधनात कॅन्सर पिडीत लोकांच्या ट्युमरच्या नमुन्यात काही बॅक्टेरियाचा शोध लागला होता. साल २०१८ च्या सध्याच्या रिसर्च टीम शोध लावला की प्रयोगातील हेल्दी लोकांत बॅक्टेरिया काळानुरुप एचएनएससीसी येणाऱ्या जोखीमेत वाढ करु शकतात हे आढळल्याचे NYU ग्रॉसमॅन स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये पॉपुलेशन हेल्थ डिपार्टमेंटमध्ये पोस्ट डॉक्टरल फेलो क्वाक यांनी सांगितले.

आपल्या दातांना दररोज ब्रश करावा आणि फ्लॉसिंग करावे. यामुळे केवळ पिरोयडोंटल आजार थांबणार नाहीत तर डोकं आणि मानेच्या कॅन्सरपासूनदेखील बचाव होईल.

# वन व्यवस्थापनातून शाश्वत रोजगाराची हमी

## सुधागडमध्ये 'नरेगा' अंतर्गत कामांची सुरुवात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिवे येथील सामुहिक वनहक्क मान्यताप्राप्त वन क्षेत्रामध्ये मजरे जांभूळपाडा आदिवासीवाडीतील कुटुंबांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामांना सुरुवात झाली. वनांचे संरक्षण, संवर्धन व शाश्वत व्यवस्थापनातून आदिवासी लोक समुदयांना शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

या अंतर्गत मंजूर वन तलावासाठी पाच लाख २८ हजार ९०८ रुपये निधी मंजूर झाला असून या कामांतर्गत १९७६ लोकांना रोजगार मिळणार आहे. या कामांतर्गत मजरे जांभूळपाडा येथील आदिम आदिवासी लोकसमुदायांना शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. मजरे जांभूळपाडा या गावला २०१९ साली कॉंपार्टमेंट नंबर ६५१मध्ये एकूण १३९.५ एकर इतक्या वन क्षेत्रावर वनहक्क कायदा २००६ चे



कलम ३(१) अंतर्गत सामूहिक वनहक्क अधिकार मान्यता प्राप्त झाले आहेत. या सामूहिक वनहक्क क्षेत्राच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी सबंधित सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, मजरे जांभूळपाडा व वन विभाग, सुधागड पाली यांनी संयुक्तरित्या सूक्ष्म नियोजन केले होते. सामुहिक वनहक्क वन क्षेत्रात मंजूर वन तळे खोदण्याचे काम सुरू करण्यात आले. या वेळी सुधागड तालुक्याचे वन प्रिकहेटर अधिकारी दादासाहेब कुकडे, सरपंच रोहिदास सखेकर, वनपाल मनोज साळवी, संकेत गायकवाड, वनरक्षक विनोद चव्हाण, कार्यक्रम व अभियान प्रमुख, वातावरण फाऊंडेशन राहुल सावंत, अंकुश लोणकर, शिवाजी हिरडे, रमेश साखरे, तालुका समन्वयक, वातावरण फाउंडेशन व सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, मजरे जांभूळपाडाचे सदस्य उपस्थित होते.

**वनसंरक्षण व शाश्वत वन व्यवस्थापनासाठी आदिवासींना गावालगतच्या वनक्षेत्रात आवश्यक कामाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आज या नागरिकांना रोजगार सुरु होतोय ही मनस्वी आनंदाची बाब आहे.**
**–राहुल पाटील, उपवनसंरक्षक, अलिबाग**

**आदिवासींनी पिढ्यान्‌पिढ्या वनांचे रक्षण केले आहे. रोजगार हमी योजनेतून वनसंरक्षण व व्यवस्थापनाच्या कामाला आजपासून सुरुवात झाली आहे. स्थलांतराची ही शृंखला संपण्याची ही निर्णायक वेळ आहे.**
**–राहुल सावंत, अभियान प्रमुख, वातावरण फाउंडेशन**

# नामदेव शिंपी समाजातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**रोहे : प्रतिनिधी**

श्री नामदेव शिंपी समाज सामाजिक संस्था रायगड व महाड नामदेव शिंपी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील दहावी व बारावीला तालुक्यातील प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

प्रमुख पाहुणे म्हणून ना.स.परिषद महाराष्ट्र विश्वस्त राजेंद्र पोरे, विनायक गिरमे, तानाजी साठे, महाड समाजाचे अध्यक्ष विश्वनाथ नाझरे त्यांचे सर्व पदाधिकारी, महिला अध्यक्षा रेणुका बकरे त्यांचे पदाधिकारी, युवा अध्यक्ष स्वप्निल मुळे त्यांचे पदाधिकारी, जिल्हा समाजाचे विश्वस्त अनंत ठमके, अरुण करंबे, उपाध्यक्षा मनीषा शिंत्रे, उपाध्यक्ष प्रेषित बारटक्के, सचिव हेमंत बारटक्के, सहसचिव मीनल ढवळे, सहखजिनदार सचिन ढवळे, सदस्य दर्शन काळबेरे, सल्लागार दिलीप मेकडे, दिलीप कारंबे, प्रतिनिधी मनीष करंबे, विद्यार्थी, समाजबांधव उपस्थित होते.

या वेळी मुख्य विश्वस्त राजेंद्र पोरे यांनी, कोकण विभाग हुशार बुद्धिमान आहे. सृष्टीसौंदर्य मोहक आहे. या भागातील आपला समाजदेखील अध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्या नेतृत्वाखाली उत्तम काम करीत आहे, असे कौतुक केले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. मंगळागौरी कार्यक्रमात मुरूड महिलांनी उत्कृष्ट कार्यक्रम सादर केल्याबद्दल सत्कार केला.



# माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा परिवहन महामंडळाचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते तसेच शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या उपस्थितीत उत्साहात झाला.

कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, नवनिर्वाचित नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर–काळे, पं. स. माजी सभापती संगीता बक्कम, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, उद्योजक विजय मेथा, सुभाष दळवी, नगरसेवक राजेश मेहता, दिनेश रातवडकर, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, आदर्श शिक्षिका विनया जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप, प्रा.शब्बीर हज्जू, शादाब गैबी, भागोजी डवले, डॉ.इस्माईल राहटविलकर, ॲड. रोशन पांढरे, जितेंद्र टेंबे, कपिल गायकवाड, प्रियांका सतेरे–गांगण, सुवर्णा जाधव, नंदिनी बामगुडे, दत्ताराम खांबे, दिपक पाटील, संजय पोळ, तुषार सुर्वे, सुमित जाधव यांचा तसेच विशेष सत्कारमूर्ती नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर–काळे, राजिपच्या आदर्श शिक्षक पुरस्काराच्या मानकरी अपूर्वा जंगम, केंद्रप्रमुख शंकर शिंद, स्वच्छता ब्रँड अँबॅसिडर विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, काशीराम पोवार, अशोक धारिया, यशवंत मेथा, संजय गांधी, सुभाष मेथा, तनुजा मेथा, सुप्रिया शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत. उत्सवाचे दिवस असल्याने वाहतूक वाढली आहे. त्यामुळे अशा बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.६) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ४६९ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून चार लाख २१ हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# नागाव कवळेपाडा येथे शिवकालीन शस्त्र प्रदर्शन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव कवळेपाडा येथे नवतरूण नवरात्रोत्सव मंडळाच्या स्त्युत्य उपक्रमाने शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन सोमवारी (दि.७) केले होते.

या शस्त्र प्रदर्शनाच्या माध्यमातून इतिहास जिवंत ठेवण्याचे कार्य नागाव कवळेपाडा येथील नवतरूण नवरात्रोत्सव मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र नागलेकर, उपाध्यक्ष दिपक वर्तक, सचिव राजेंद्र नाईक, खजिनदार समिर नाईक व सर्व सभासदांनी केले.

प्रदर्शनाचा शुभारंभ नागाव संचालक मंडळ हायस्कूलचे कार्याध्यक्ष एम.एम. पाटील, मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र नागलेकर, ग्रामपंचायत सदस्या प्रिया काठे, विणा पिंपळे, रोहिणी म्हात्रे, निकिता पाडेकर, लिना घरत तसेच परेश ठाकूर यांची उपस्थिती होती.

प्रदर्शन पाहण्यासाठी नागाव ग्रामस्थ तसेच विद्यार्थीवर्गाने मोठया संख्येने हजेरी लावली. शिवमर्दानी आखाडचाचे व्यवस्थापक किशोर चवरकर, शुभम चवरकर व सहकाऱ्यांनी विविध शस्त्रांची माहिती दिली.




## CHANGE OF NAME

I the undersigned **Mr. Sukhraj** (Old name) residing At **Aayushi Home, Flat No. 201, Plot No. 76, Sector 5 A, Panvel, Karanjade. Tal. Panvel, Dist. Raigad. Pin-410206**

I Changed my name by the **Affidavit No. 12839/2024** dated **7 October 2024. Sukhraj Ramtaul Chaurasiya**

So that I remitter issue may here after be called by new Name **Sukhraj Ramtaul Chaurasiya.**

Sign. by New Name
**Sukhraj Ramtaul Chaurasiya.**



**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**
माथेरान, ता. कर्जत, जिल्हा – रायगड. ४१०१०२,
ई–मेल आयडी : mcomatheran@gmail.com

जावक क्र. : मागिनप/०५५/२०२४–२५ दिनांक : ०७/१०/२०२४

**शुद्धिपत्रक**

याद्वारे सर्व संबंधित इच्छुक पुरवठादार यांना कळविण्यात येते कि, माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेची निविदा सुचना क्र. मागिनप/००११/२०२४–२५ दिनांक– २५/०९/२०२४ दैनिक रामप्रहर या वृत्तपत्रात दिनांक– २८/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

प्रशासकीय कारणास्तव सदर निविदा सूचना दिनांक ०८/१०/२०२४ पासून दिनांक ०९/१०/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. मूळ निविदेतील अटी– शर्ती मध्ये या व्यतिरिक्त कोणताही बदल नाही.

सही/–
**(राहुल इंगळे)**
मुख्याधिकारी
माथेरान गिरीस्थान नगरपरिषद


# खोपोलीत ज्येष्ठ नागरिक सभेचा वर्धापन दिन आणि मान्यवरांचा सन्मान



**खोपोली : प्रतिनिधी**

नुकताच ज्येष्ठ नागरिक सभा खोपोलीचा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला.

प्रमुख पाहुणे फेस्कॉम कोकण विभाग अध्यक्ष शा.गो. पाटील व रायगड जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर उपस्थित होते. अध्यक्ष एल.बी. पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. वर्धापनदिनाचे औचित्य साधून ७५ वर्षे पूर्ण झालेल्या व विवाहास ५० वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्याचे सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच विविध सामाजिक संस्था व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, पत्रकार यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. सत्यनारायणाची पूजा, नंतर भजन व त्यानंतर सर्व सदस्यांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

आभार उपाध्यक्ष वर्षा जोगळेकर यांनी मानले तर सूत्रसंचालन रवींद्र घोडके यांनी केले. संस्थेतर्फे अहवाल प्रकाशित करण्यात आला.

## उद्या पोलादपूर येथे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

**पोलादपूर** : आकार प्रतिष्ठानतर्फे बुधवारी (दि.९) दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्‌घाटन महाड उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांच्या हस्ते होणार आहे.

इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विवेक मेहेत्रे यांचा 'चला यशस्वी होऊ या' कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याप्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त महाप्रबंधक सुनील चव्हाण यांचेही विद्यार्थ्यांसाठी बँकेच्या विविध शैक्षणिक कर्जांबाबत मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

विवेक मेहेत्रे हे लेखक, इंजिनियर, कवी, प्रकाशक, संपादक, प्रशासक, प्रभावी वक्ते, संगणक अभ्यासक, व्यंगचित्रकार, मोटीवेशनल स्पीकर तसेच कोच असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून विवेक मेहेत्रे यांचे दोन सत्रात मार्गदर्शन होणार आहे. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.५२७/५२९/२०२४ दिनांक : ०७/१०/२०२४

**ई–निविदा सूचना**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | ई–निविदा किंमत रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील के.एल.–४,प्लॉट–१६, सेक्टर–४ई येथे खेळाचे मैदान विकसित करणे. | PMC/PWD/CE/06/2024-25 | २,९१,४३,४३५ (GST वगळून) | २,३६०/– | १२ महिने |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०८/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त–I
पनवेल महानगरपालिका, पनवेल



**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा यांचे कार्यालय,
वन भवन, रोहा चणेरा रोड, रोहा, जि. रायगड, पिन – ४०२१०९ दूरध्वनी क्र :– ०२१९४–२३५७५५
Email ID: dycfroha@mahaforest.gov.in

**ई निविदा सूचना**

उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा हे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता दि. ०७/१०/२०२४ ते १२/१०/२०२४ या कालावधीत ब–१ नमुन्यातील विवरणपत्राद्वारे ई–निविदा प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. ई–निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. ई–निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, रोहा यांनी राखून ठेवला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | ई– निविदा क्रमांक | कामाचे विवरण | ई–निविदा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | P2/2024-25 | Construction Of Water Bound Macadam Pathway At Jamgaon C. No. 379 part, Range Roha, Tal Roha, Dist Raigad | 69,63,628/- |

खालील संकेतस्थळावर ई–निविदेबाबतची सर्व सविस्तर माहिती उपलब्ध आहे.
१) https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)
२) उप वनसंरक्षक, रोहा यांचे कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. ब/३०/योजना/ईनिविदा/२५५८/२०२४–२५
रोहा ४०२ १०९, दिनांक ०४/१०/२०२४
उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग यांचे कार्यालय

सही/–
**(अप्पासाहेब निकत)**
उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा

विमाका/कोवि/२०२४–२५/१८७



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ६३ सन २०२४-२०२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ – २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक ०५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १२/१०/२०२४ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक १३/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १३/१०/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील.** निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तालुका फळरोपवाटीका लोणेरे येथे विहीरीपासून ते पॉलीहाऊस पर्यंत अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ९६४८१९ | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | तालुका फळरोपवाटीका रेपोली येथे पॉलीहाऊसकडे जाणार अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ९६५७६३ | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | तालुका फळरोपवाटीका लोणेरे येथे मुख्यव्दारापासून ते मातृवृक्षापर्यंत अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ९३७९१६ | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | तालुका फळरोपवाटीका रेपोली येथे जूने मातीशेडची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ८४५६६७ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मौजे धारवली अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ८१६०८८ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे कोंढवी बौध्दवाडी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ८१५८७४ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे कापडे बु. धम्मशीलनगर येथे रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड | ८१३००६ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | तालुका फळरोपवाटीका रेपोली येथे कार्यालयाकडे जाणारा अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ६६७३८१ | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | बामणघर बौध्दावाडी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, तालुका तळा, जिल्हा रायगड. | ६५८७७ | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | तालुका फळरोपवाटीका रेपोली येथे पंप हाऊस क्रा.२ ची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ५६१०४७ | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | मौजे निगडे ग्रा. पं. निगडे ता. महाड फणसकोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ४८८४१५ | ५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | तालुक फळरोपवाटीका रेपोली येथे गांडूळ खताकरिता खोलीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४०१९६० | ५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १३ | तालुका फळरोपवाटीका लोणेरे येथे पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ३३७५७० | ४००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १४ | तालुका फळरोपवाटीका रेपोली येथे पंप हाउस क्रा. १ ची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ३५५६१२ | ४००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १५ | तालुका फळरोपवाटीका लोणेरे येथे स्वच्छातागृहाची दुरूस्ती करणे. माणगांव, जिल्हा रायगड. | २०८९९१ | ३००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग नऊ व वरील |

टिप :– १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४७९८
दिनांक : ०४/१०/२०२४

विमाका/कोवि/२०२४–२०२५/१८३

सही/–
**कार्यकारी अभियंता**
महाड (सा.बां.) विभाग, महाड

# विकासकामांसाठी आभार रॅली

## नेरे परिसरात बाईकस्वार भाजप युवा कार्यकर्त्यांचा झंझावात







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कर्तृत्ववान नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघाचा वेगाने विकास होत आहे. त्यांच्या सातत्यापुर्ण पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे नेरे तसेच आजुबाजुच्या परिसरातील विकासकामांसाठी तब्बल पाच कोटी रुपयांपेक्षा अधिकचा निधी मंजूर केला आहे. त्यांच्या या कार्याचे आभार मानण्यासाठी भाजप युवा मोर्चाच्या वतीने बाईक रॅलीचे आयोजन रविवारी (दि.७) करण्यात आले होते.

नेरे येथे भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या कार्यालयापासून या बाईक रॅलीला सुरुवात झाली. तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील यांच्या हस्ते रॅलीचा झाला. नेरेपाडा–वाजे–मालडुंगे–शिवणसई–दुंदरे–रिटघर या भागातून मार्गक्रमण करत चिंचवली येथे रॅलीचा समारोप झाला. या वेळी माजी पं. स. सदस्य राज पाटील, रोशन पाटील, अमर शेळके, गोटीराम म्हात्रे आदी उपस्थित होते.



**खारघर : भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या व आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर श्री कच्छ कडवा पाटीदार समाज आयोजित नवरात्रोत्सवाला भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, मंडळ चिटणीस शैलेंद्र त्रिपाठी, उत्तर भारतीय मोर्चाचे सुमित सहाय, सुनील कटके, आदित्या हाटगे, दीपक ठाकूर आदी उपस्थित होते. या सर्वांचे पाटीदार समाजाचे प्रमुख कांतिभाई पटेल व युवक मंडलचे प्रमुख राजेश पटेल, समाजाचे सरचिटणीस सुरेशभाई नाक्राणी, युवक मंडळाचे सरचिटणीस हसमुख भाई दडगा यांनी स्वागत केले.**



**पनवेल : भाजपचे शहर उपाध्यक्ष अमित ओझे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे गोवा प्रदेश महामंत्री माजी आमदार दयानंद सोपटे आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी ओझे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी कामगार नेते रवी नाईक, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, अभिषेक पटवर्धन आदी उपस्थित होते.**

### दुर्गामाता दौड (माळ पाचवी)



**पनवेल : शारदीय नवरात्र उत्सवात पाचव्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौक खांदा कॉलनी येथून प्रेरणा मंत्र घेऊन दौड सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत संपूर्ण खांदा कॉलनीमध्ये दौड काढण्यात आली. नंतर दौड सप्तशृंगी सांस्कृतिक आणि सामाजिक विकास मंडळाच्या मंडपात येऊन पोहचली. तेथे देवीची आरती करण्यात आली, श्लोक व गोंधळ घेण्यात आला व ध्येयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.**

## भाजपतर्फे उलवे नोडमध्ये हळदीकुंकू समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवानिमित्त सेक्टर १९ येथे भाजप उलवे नोड १ व २ कमिटी व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत जिवदानी उत्कर्ष महिला मंडळांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, अध्यक्ष सुनंदा म्हात्रे, नामदेव ठाकूर, किरण जगताप, संतोष तुडमे, अवधेश महतो, रविकांत म्हात्रे, समाधान पाटील, योगिता खोत, प्रिया अडसूळ, आशा पाटील, संगीता कांबळे, वनिता बाबर, छाया चौधरी, प्रीतम घरत, विजय पाटील, चंद्रकांत म्हात्रे आदींची उपस्थिती लाभली. हळदी कूंकू समारंभात १५०हून अधिक महिलांनी सहभाग घेतला होता. त्यांनी अनेक खेळ खेळून पैठणी व बक्षिसेही जिंकली.



**पनवेल : मोरबे येथील भाजप युवा नेते दिनेश फडके यांना वाढदिवसानिमित्त पक्षाचे नेते एकनाथ देशेकर यांच्यासह कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या.**



युवा उत्कर्ष मंडळ, श्रीनगर, थळ डोंगरी

## डॉ. शुभदा नील यांना पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बीके डॉ. शुभदा नील यांना, गर्भ संस्कार व वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी, पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने नवदुर्गा सन्मानाने रोटरी क्लब पनवेलचे मा डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या वेळी पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष व संस्थापक डॉ. वैभव मोकल, असोसिएशनचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.



**उलवे नोड : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील उलवे नोड सेक्टर १५, १६, १७ येथील लाभार्थी महिलांना आमदार महेश बालदी यांच्याकडून साड्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप उलवे नोड उपाध्यक्ष अवधेशकुमार महतो, नामदेव ठाकूर, सुनील मौर्य, मनोज यादव आदी उपस्थित होते.**



दुर्गामाता मित्र मंडळ केळवणे, उरण



नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ, बोरी, उरण



पाटील कुटुंबीय, धुलीवाडा, उरण

नवरंग पांढरा



सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल



सीकेटी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग विद्यालय, नवीन पनवेल



जोवीस हॉस्पिटल, दादर, मुंबई



प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेविका, खालापूर



जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण, उरण

## 'लायन्स'च्या आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन क्लब ऑफ पनवेलच्या ऑक्टोबर सेवासप्ताहानिमित्त गोखले हॉल पनवेल येथे शुक्रवारी (दि.४) डायबेटिज तसेच नेत्र तपासणी, कान तपासणी, बोन डेन  सिटी तपासणी, इसीजी व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला अशा विविध प्रकारच्या मोफत तपासण्यांच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष एस जी. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. या शिबिरामध्ये जवळजवळ ८५ लोकांनी सहभाग घेतला होता. प्रख्यात डायबेटॉलॉजिस्ट डॉ. कीर्ती समुद्रा एम. डी. मेडिसिन व डॉ महेश पाटील डायबेटीज नुट्रीशिअन यांना मार्गदर्शन केले.

या शिबिरासाठी अध्यक्ष एस जी. चव्हाण, आर सी. सुयोग्य पेंडसे, सचिव अशोक गिल्डा, एएसएन मूर्ती डीसी साईट फर्स्ट, प्रो. कॉर्डीनेटर ज्योती देशमाने, मधुकर भगत, राजेंद्र जेसवाणी, भावना जेसवाणी, लुईस कोलॅको, सुरभी पेंडसे, शोभा गिल्डा, लेडी गीता म्हात्रे, अलका चव्हाण, मंगला ठाकूर, प्रतिमा चौहान, प्रमोद गजहंस, सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई कामोठे यांनीसुद्धा सहभाग घेतला होता. या शिबिरामध्ये अध्यक्ष अरुणा सावंत व सेक्रेटरी सुजाता तसेच संदेश महाडिक, दीपक जाजू उपस्थित होते.

# रायगड पोलिसांचा बालसुरक्षेसाठी अनोखा जागर

## विविध नवरात्रोत्सव मंडळामध्ये स्टीकर्स, पोस्टर्स लावत केली जनजागृती

**अलिबाग : प्रतिनिधी**

बाललैंगिक शोषणाला प्रतिबंध घालण्यासाठी जिल्ह्यातील नवरात्रोत्सव मंडळात बालकांच्या सुरक्षेसंदर्भातील स्टीकर्स व पोस्टर्स लावत जनजागृती करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधिक्षकांनी या मंडळांना भेटी देत बालसुरक्षेचे महत्त्व पटवून दिले आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये बाल लैंगिक शोषणाला प्रतिबंध घालण्यासाठी नवरात्र उत्सवात बालसुरक्षा जाणीव जागृती अभियान जिल्हा पोलीस विभाग, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय, अर्पण संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १५ तालुक्यांमधील १५० नवरात्रोत्सव मंडळांत ही मोहीम राबविण्यात येत आहे.

अलिबाग येथील श्रीकृष्ण नवरात्र मंडळ, बायपास येथून या अभियानास सुरुवात करण्यात आली. ३ ते ११ ऑक्टोबरपर्यंत अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानात नवरात्र उत्सव असलेल्या मंडळामध्ये बाललैंगिक शोषण टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक वैयक्तिक सुरक्षा शिक्षण आणि 'काळजी वाहकांनी घ्यावयाची काळजी' याविषयी बॅनर लावून बालक व पालकांमध्ये जनजागृती करीत संदेश पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे.

या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, अलिबाग पोलीस निरीक्षक किशोर साळे, महिला विभागाच्या पोलीस निरीक्षक रिजवाना नदाफ, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ आदी उपस्थित होते.

**लहान मुलांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभागातर्फे जिल्ह्यातील १५० नवरात्रोत्सव मंडळात पोस्टर लावून बालसुरक्षेसाठी आवाहन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय, रायगड यांचे मोलाचे सहकार्य आहे.**
**–सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड**

**अलिबाग हद्दीतील सातही नवरात्रोत्सव मंडळात बालसुरक्षेसंदर्भात पोस्टर्स व स्टीकर्स लावण्यातच आले आहेत, तसेच नवरात्रीसाठी जमलेल्या नागरिकांना याबाबत जनजागृती केली आहे.**
**–किशोर साळे, पोलीस निरीक्षक, अलिबाग**

## जिल्हा रुग्णालयात डायलेसिस उपचारासाठी धनादेश सुपूर्द

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळतर्फे रायगड जिल्ह्यातील डायलेसिस रुग्णांना औषधोपचार उपलब्ध व्हावा यासाठी रु.२० लाखांचे अर्थसहाय्य सीएसआरच्या माध्यमातून देण्यात आले आहे. आरसीएफचे प्रभारी कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी सोमवारी (दि.७) जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत जिल्हा शल्य चिकित्मक डॉ.अंबादास देवमाने यांना धनादेश सुपूर्द केला.

या वेळी आरसीएफचे प्रभारी कार्यकारी संचालक नितीन हिरडे, संजीव हरळीकर, महाव्यवस्थापक महेश पाटील प्रभारी मुख्य व्यवस्थापक (प्रशासन) व जनसंपर्क अधिकारी संतोष वझे उपस्थित होते.

जिल्हा सामान्य रुग्णालयात सुमारे ६०० डायलेसिस सेशन्स होतात. या रुग्णांकरिता कंझ्युमेबल्स, सोल्युशन्स व औषधे खरेदीसाठी तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबतचे विनंतीपत्र आरसीएफला दिले होते. त्यानुसार आरसीएफ व्यवस्थापनाने संचालक मंडळाच्या बैठकीत सुमारे २० लाख रुपयांचे अर्थसहाय्य सीएसआर अंतर्गत तत्काळ मंजूर करून घेतले.



## नागोठण्यात ठिकठिकाणी दुर्गामाता दौडचे स्वागत व पूजाअर्चा

**नागोठणे : प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान नागोठणे विभागाच्या वतीने श्री दुर्गामाता दौड गेली अनेक वर्षे मोठ्या जल्लोषात काढली जाते. घटस्थापना ते विजयादशमी दसरा असे नऊ दिवस नागोठण्याच्या प्रत्येक विभागातून दुर्गामाता दौड काढून पुजा व आरती केली जाते. त्याच अनुषंगाने नागोठणे विभागात श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली असून दौड नागोठणे खडकआळी येथील श्री स्वामी समर्थ यांच्या मठा समोर आली.



खडकआळीतील ग्रामस्थांनी श्री दुर्गामाता दौडचे स्वागत करून पुजा व आरती केल्यानंतर दौड पुढे मार्गस्थ झाली. खडकआळी येथे दौड आली. त्या वेळी हिंदू जनजागृती मंचचे चेतन कामथे, चेतन गायकर, मयूर नाईक, निलेश भोपी, संतोष जोशी, गौरव राऊत, मयुर शिर्के, रवि भोईर, नागोठणे ग्रामपंचायत सदस्य सचिन ठोंबरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती देताना हिंदू जनजागृती मंचचे चेतन कामथे यांनी सांगितले की, श्री दुर्गामाता दौड काढण्यामागाच्या उद्देश म्हणजे समस्त हिंदू समाजबांधवांनी शिवछत्रपती आणि आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ध्येयधोरणांचे अवलंबन करावे, यासाठी जगतजननी आई तुळजा भवानी मातेकडे प्रार्थना करणे म्हणजेच श्री दुर्गामाता दौड असल्याचे चेतन कामथे यांनी सांगितले.

## चिंचवली-नारंगी आदिवासीवाडी येथे विधी साक्षरता शिबिर उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने चिंचवली-नारंगी आदिवासीवाडी येथे विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश अमोल शिंदे अध्यक्षस्थानी तर अधीक्षक प्रणिता मगर उपस्थित होते.



ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. नीला तुळपुळे यांनी, महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे, पण बाहेर पडल्यावर पुरुषांपासून संरक्षण मिळण्यासाठी काय केले पाहिजे ते सांगितले. वाडीवर एखाद्या मुलीवर प्रसंग आला तर काय करावे हे माहित असायला पाहिजे. महिलांची शक्ती काय असते हे सांगून तुम्ही संघटीत रहाणे गरजेचे आहे असे सांगितले. महिलांसाठी कोणते कायदे आहेत हे समजावून सांगितले.

प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश अमोल शिंदे यांनी मार्गदर्शन करताना लहान वयात लग्न करू नये, असे प्रतिपादन केले. लहान वयात मुलीचे लग्न झाल्यानंतर काय दुष्परिणाम होतात हे समजावून सांगितले. त्यासाठी १८ वर्षानंतर लग्न केले पाहिजे व मुलाचे वय २१ झाल्याशिवाय लग्न करू नये. मुलींना चांगले शिक्षण दिले तर त्यांना आरक्षणामध्ये चांगली नोकरी लागू शकते. त्यासाठी लवकर लग्न करायची पद्धत सोडून दिली पाहिजे, असेही सांगितले. महिलांसाठी कोणत्या योजना आहेत हे समजावून सांगितले. जिल्हा विधी प्राधिकरणाच्या वतीने महिलांना मोफत वकील मिळतो हे सांगितले.

रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश अमोल शिंदे यांचे स्वागत अ‍ॅड. निला तुळपुळे यांनी केले. प्रस्तावना रश्मी ठाकुर यांनी केले.

## खालापूर लायन्स क्लबतर्फे पोलिसांची नेत्र तपासणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर लायन्स क्लब यांच्या वतीने आणि अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई आणि नायर हॉस्पिटल मुंबई यांच्या सौजन्याने खालापूर पोलिसांची नेत्रतपासणी करण्यात आली.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, सपोनि.पवार, गटविकास अधिकारी संदिप कराड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, पोलीस पाटील, दिव्यांगांची नेत्रतपासणी करण्यात आली. हा कार्यक्रमासाठी अध्यक्ष शिवानी जंगम, लहू भोईर प्रथम उपाध्यक्ष, किशोर पाटील खजिनदार, उपाध्यक्ष भरत पाटील, लायन हरिभाऊ जाधव, कांचन जाधव, महेंद्र सावंत, अशोक पाटील आदी उपस्थित होते.



### निवडक



### रोह्यात शार्विका म्हात्रेचा सत्कार

**रोहे** : सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत महाराष्ट्रातील १०७ गडदुर्ग यशस्वीरित्या सर करणारी शार्विका जितेन म्हात्रे या चिमुकलीचा सत्कार महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या उत्सवात दरवर्षी नऊ दिवस वेगवेगळ्या क्षेत्रात ठसा उमटणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात येतो. त्या अनुषंगाने शर्विकाचा सन्मान करण्यात आला.

### डॉ. सचिन चव्हाण यांचा सन्मान



**माणगाव** : जयपूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील इटर्नल व्हॉइस ऑफ डॉक्टर्स स्पर्धेच्या ग्रँड फिनालेच्या स्टेजवर प्रसिद्ध गायक अमित कुमार, कविता कृष्णमूर्ती व कुणाल गांजावाला यांच्या हस्ते झोनल को-ऑर्डिनेटर म्हणून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल व गायनासाठी माणगाव येथील सर्जन डॉ. सचिन चव्हाण यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान दिल्याबद्दल डॉ. चव्हाण यांनी स्पर्धेचे आयोजक डॉ. जितेंद्र मक्कर व डॉ. सौरभ जैन यांचे आभार मानले.

### मांडला केंद्रप्रमुखपदी सुनील पाटील

**मुरूड** : शिक्षण विभागाच्या मांडला केंद्रात सुनील पाटील यांची सेवाज्येष्ठतेने केंद्रप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाचा राज्य आदर्श शिक्षक हा अतिशय मानाचा पुरस्कार मिळवलेल्या पाटील सरांची अध्यापनाची मनोरंजक शैली, विद्यार्थ्यांप्रती आपुलकी, शिस्त, विविध सहशालेय उपक्रमातील सहभाग, क्रीडास्पर्धा यातून हजारो विद्यार्थ्यांना त्यांनी यशाचा राजमार्ग दाखवला. या वेळी मानी ग्रामपंचायत सरपंच अस्मिता म्हात्रे, वायशेत केंद्रप्रमुख विकास पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विवेक म्हात्रे, रोशनी पाटील, पत्नी संध्या पाटील, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष महेश म्हात्रे, रमेश धुमाळ, स्वाती म्हात्रे, संगीता बरवड, अनिषा पाटील यांसह केंद्रातील सर्व शिक्षक, पोलीस पाटील, विद्यार्थी उपस्थित होते.



### वाघोली येथे रक्तदान शिबिर

**नागोठणे** : वाघोली येथे उन्नती सांस्कृतिक मंडळातर्फे नवरात्रोत्सवानिमित्त आरोग्य व रक्तदान शिबिर आयोजिले होते. शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर व डॉ. सुभाष म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. आरोग्य शिबिराचा ७३ जणांनी लाभ घेतला, तर रक्तदान शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. या वेळी डॉ. प्रतिभा म्हात्रे, डॉ. सूर्यवंशी, डॉ. हुलवान, ग्रामपंचायत सरपंच अजिता गावंड-गजने, ग्रामपंचायत सदस्य प्रगती शिंगरूत, चारुशीला कोरडे, निवृत्त शिक्षक सुरेश वालेकर, पोलीस पाटील जयवंत वालेकर, मंडळाचे अध्यक्ष शैलेश केवणे, गजेंद्र दळी, अ‍ॅड. मनोज पडते आदी उपस्थित होते.

## खालापूर भाजपतर्फे खेळ पैठणीचा कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात ग्रामीण भागातील वावोशी या ठिकाणी भाजपाच्या खालापूर तालुका मंडळ विभागाच्या वतीने महिलांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला जवळपास १५००पेक्षा जास्त महिलांनी हजेरी लावल्याने आयोजकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पहायला मिळाले.



शासनाच्या वतीने महिलांसाठी राबविली जाणारी लाडकी बहीण योजनेचे संकल्पक राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे असून त्यांनीच सदरची योजना कार्यान्वित केली आहे. लाडक्या बहिनींचा लाडका देवा भाऊ असल्याने या योजनचा नक्की महिलांना काय फायदा झाला आहे. याची माहिती घेण्यासाठी सदरच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असल्याचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

कार्यक्रमाचे नियोजन जि. प. माजी सभापती नरेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, सनी यादव, नागेश पाटील, रवींद्र पाटील, भरत महाडिक, सुजाता दळवी, श्वेता मनवे, निकीता हेलंडे, वत्सला मोरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत विधानसभा संघटक किरण ठाकरे, अश्विनी पाटील, संदीप पाटील, रवींद्र मोरे, विकास रसाळ, प्रवीण मनवे आदी अन्य मान्यवर उपस्थित होते.

**शासनाची जी लाडकी बहीण योजना आहे. त्या संकल्पनेचे खरे सुत्रधार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यांनी या योजनेसाठी अथक मेहनत घेतली असल्याने या योजनेमुळे महिलांच्या नक्की काय प्रतिक्रिया आहेत हे समजून घेण्यासाठी संपूर्ण राज्यभरात भाजपच्या वतीने महिलांचे मेळावे घेतले जात आहेत.**
**–सनी यादव, उपाध्यक्ष, भाजप रायगड**

**भाजपच्या वतीने आयोजित खालापूर तालुक्यात ग्रामीण भागातील महिलांचा हा पहिलाच कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाला ५०० महिलांची उपस्थिती विचारात घेतली होती, मात्र या ठिकाणी आलेल्या १५००पेक्षा जास्त महिलांची उपस्थिती आम्हाला नवी प्रेरणा देणारी आहे.**
**–श्वेता प्रवीण मनवे, महिला कार्यकर्त्या**

## महाडचा श्रेयस वैद्य शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाडचा सुपुत्र श्रेयस रवींद्र वैद्य याला महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सन २२-२३ वर्षाकरिता शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ऐतिहासिक व सामाजिक क्रांतीचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाड नगरीच्या वैभवामध्ये हा मानाचा तुरा असल्याची भावना महाडकरांमधून व्यक्त होत आहे.



श्रेयसचा जन्म महाड येथे झाला असला तरीही त्याचे वडील रिलायन्स कंपनीमध्ये आहेत. यामुळे त्याचे शालेय शिक्षण रिलायन्स टाऊनशिप नागोठणे येथे झाले. आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रेयस याने सन २०११मध्ये इंडोनेशिया येथे झालेल्या आशियाई स्पर्धेमध्ये वॉटर पोलो संघाचा कप्तान म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. सिंगापूर येथे झालेल्या सन १९ व थायलंड २२ येथील स्पर्धेतही श्रेयस सहभागी झाला होता. महाराष्ट्राच्या वतीने खेळताना केरळ येथे २०१५मध्ये झालेल्या ३५ व्या सन २०२२मध्ये ३६ राजकोट येथे झालेल्या तसेच गोवा २३मध्ये ३७व्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करताना अनुक्रमे कांस्य, तर २०२३मध्ये सुवर्णपदक प्राप्त केले.

सन २०२१, २२, २३ व २४ या वर्षात राष्ट्रीय पातळीवर झालेल्या स्पर्धांमधून चमकदार कामगिरी केली आहे. वॉटरपोलो स्पर्धेतील श्रेयसच्या चमकदार कामगिरीमुळे त्याची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

श्रेयस वैद्यने वयाच्या सहाव्या वर्षी धरमतर खाडी पोहून जाण्याचा विक्रम केला होता. लहानपणापासूनच जलतरण विषयामध्ये त्याला असलेली विशेष रुची लक्षात घेऊन त्याच्या कुटुंबाने क्रीडा शिक्षकांकडून त्याच्याकडे अधिक लक्ष देऊन या क्षेत्रात दिलेल्या संधीचे शासनाकडून प्राप्त झालेल्या या पुरस्काराने सोने केल्याची प्रतिक्रिया वैद्य कुटुंबीयांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# कर्जतच्या मार्शल आर्ट्स खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड




**कर्जत : प्रतिनिधी**

पुणे येथे झालेल्या अर्निस (मार्शल आर्ट्स) राज्यस्तरीय स्पर्धेत कर्जतमधील शारदा विद्यामंदिरच्या सात खेळाडूंनी पदकांची कमाई केली. त्यामुळे त्यांची जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शारदा विद्या मंदिरच्या दक्ष नागवकर (सुवर्णपदक), विनंती खडके, माही चौहान (रौप्यपदक), प्रेम देशमुख, कबीर गायकवाड, श्रावणी काळबाडे, कार्तिकी सरोदे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. त्यामुळे रायगड जिल्ह्याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. या यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र आर्मी असोसिएशनचे अध्यक्ष व सचिव आत्तर यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याचे जाहीर केले. रायगड जिल्हा सचिव स्वप्नील अडुरकर व मोहिनी अडुरकर यांनीही कौतुक करून शुभेच्छा दिल्या.




## राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंगमध्ये बेलापूरच्या मुस्कानला 'सुवर्ण'

**नवी मुंबई : बातमीदार**

पॉवरलिफ्टिंग या पुरुषी मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या क्रीडा प्रकारात बेलापूरच्या मुस्कान शेख हिने नेत्रदीपक कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. मुंबईतील वडाळा विभागात आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मुस्कानने सबज्युनिअर गटात तब्बल ६० किलो वजन उचलले.

मुस्कानच्या या सुवर्ण यशामागे तिची अफाट मेहनत आहे. मुस्कानची घरची परिस्थिती तशी बेताची असल्यामुळे तिला या खेळासाठी लागणार पैसा हा स्वतः काम करून उभा करावा लागतोय. तिने बेलापूर गावातील विद्या प्रसारक शाळा व महाविद्यालयातून बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर ती खासगी नोकरी करू लागली, परंतु पॉवरलिफ्टिंगचा दररोज न चुकता सराव केला आणि नोकरी आणि खेळ यात समतोल राखत यश मिळवले. या यशाचे श्रेय तिने आई आणि प्रशिक्षक हर्षद मधुकर भोईर यांना दिले आहे.

## तलवारबाजी स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा नुकतीच खारघरच्या केपीसी स्कूल येथे झाली. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

सीकेटी विद्यालयातील क्षितीज प्रमोद आगलावे (बारावी वाणिज्य), दुर्वेश बाळा म्हात्रे (अकरावी विज्ञान), समीक्षा संतोष पाटील (बारावी वाणिज्य) यांनी प्रथम, तर रिद्धी रमेश पाटील (बारावी विज्ञान) हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पोलिसांच्या वेटलिफ्टिंगमध्ये रितेश यादव यांना कांस्यपदक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पोलीस ठाण्यात शिपाई पदावर कार्यरत असलेले रितेश यादव यांनी छत्तीसगडमध्ये झालेल्या अखिल भारतीय पोलीस



पॉवरलिफ्टिंग मास्टर स्पर्धेत ५९ वजनी गटामध्ये कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातून १८०० पोलीस सहभागी झाले होते.

याबद्दल पोलीस शिपाई रितेश यादव यांनी सांगितले की, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला ही संधी मिळाली. त्यामुळे या स्पर्धेत खेळण्याची एक ऊर्जा मिळाली तसेच रायगड जिल्हा पोलीस खेळाडू प्रशिक्षक ऋषिकेश साखरकर यांचे चांगले मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. सुवर्णपदक थोडक्यात हुकले, परंतु पुढे संधी मिळाली तर नक्कीच यापेक्षा चांगली कामगिरी करू. या यशाबद्दल यादव यांचे किरण देशमुख, अमोल दोंदे, पोलीस उपनिरीक्षक अतुल मडके, मनोज हंबीर, दत्ता नाईक, संदेश शामा आदींसह मित्र मंडळीने अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय सायकल शर्यतीत रामशेठ ठाकूर विद्यालयाची चमकदार कामगिरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय सायकल शर्यतीचे आयोजन खारघरमधील सेंट्रल पार्क रोड येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन उज्ज्वल यश संपादन केले आहे.

सायकल शर्यतीत १४, १७, १९ वर्षाखालील मुले व मुली यांच्या मास स्टार्ट व टाईम स्टार्ट रेस घेण्यात आल्या. मास स्टार्ट रेसमध्ये १४ वर्षाखालील



मुलांच्या गटात साद शेख (इयत्ता नववी) याने प्रथम, दानिश शेख (इ. नववी) व्दितीय, राशिद खान (इ. आठवी) तृतीय क्रमांक, मुलींमध्ये खुशबू सहानी (इ. आठवी) तृतीय क्रमांक; १७ वर्षाखालील मुलांच्या गटात रोशन जाधव (इ. दहावी) प्रथम, साहिद शेख (इ. नववी) व्दितीय, नारायण साहू (इ. आठवी) तृतीय क्रमांक, मुलींमध्ये रजमिन शेख (इ. दहावी) तृतीय; तर १९ वर्षाखालील मुलांमध्ये रणविरसिंग चुंडावत (इ. नववी) तृतीय, तर मुलींमध्ये भूमी वासकर (इ. दहावी) प्रथम, सोनम कातकरी (इ. नववी) व्दितीय क्रमांक प्राप्त केला.

टाईम स्टार्ट रेसमध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटात दानिश शेख प्रथम क्रमांक, राशिद खान व्दितीय, प्रित ठाकूर तृतीय, मुलींमध्ये अक्षरा शेळके (सर्व इयत्ता आठवी) व्दितीय क्रमांक; १७ वर्षाखालील मुलांमध्ये हाफिजुल मिस्त्री (इ. नववी) प्रथम, हरिश पवार (इ. दहावी) व्दितीय,

### सहा सुवर्ण, सात रौप्य, नऊ कांस्यसह २२ पदके जिंकली

अविनाश निवळे (इ. नववी) तृतीय, मुलींमध्ये शगुन विश्वकर्मा (इ. दहावी) व्दितीय क्रमांक; १९ वर्षाखालील मुलींमध्ये सोनम कातकरी (इ. नववी) प्रथम, सुहानी ठाकूर (इ. दहावी) व्दितीय, इरम खातीब (इ. अकरावी) हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

मास स्टार्ट व टाईम स्टार्ट रेसमध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची सहा, व्दितीय सात व तृतीय क्रमांकाची नऊ अशी एकूण २२ पदके जिंकत या स्पर्धेतील वर्चस्व कायम ठेवले. यातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. सर्वांना क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लेकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रभाकर जोशी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी अभिनंदन करून पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मैदानी स्पर्धेत सुयश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी व पनवेल महापालिका यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धांचे आयोजन रोडपाली येथील नवी मुंबई पोलीस मुख्यालय मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

स्पर्धा १४, १७, १९ वर्षाखालील मुले व मुली यांच्या वयोगटात घेण्यात आल्या. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात उंच उडीमध्ये इयत्ता आठवीतील साद शेख प्रथम, राशिद खान उंच उडी व्दितीय व ८० मी. अडथळा शर्यत तृतीय, मुलींच्या गटात प्रिती सहानी हिने ८० मी. अडथळा शर्यत व्दितीय क्रमांक प्राप्त केला.

१७ वर्षाखालील मुलांमध्ये आकाश सहानी (इयत्ता नववी) याने १०० मी. अडथळा शर्यतीत प्रथम, भालाफेकमध्ये व्दितीय, विघ्नेश वास्कर (इ. दहावी) १०० मी. अडथळा शर्यत व्दितीय, उंच उडी व्दितीय, हाफिजुल मिस्त्री (इ. नववी) ४०० मी अडथळा शर्यत तृतीय क्रमांक, मुलींच्या गटात रजमिन शेख (इ. दहावी) हिने १०० मी. अडथळा शर्यत प्रथम, उंच उडी व्दितीय व ४०० मी.अडथळा शर्यत व्दितीय क्रमांक मिळवला.

१९ वर्षाखालील मुलांमध्ये आर्यन भातोसे (इ. बारावी) पाच किमी चालणे तृतीय, रेहान शेख (इ. अकरावी) ११० मी. अडथळा शर्यत तृतीय क्रमांक, मुलींमध्ये भूमी वास्कर (इ. दहावी) तिहेरी उडी व्दितीय व भालाफेक व्दितीय आणि सायली घरत (इ. दहावी) हिने उंच उडीत तृतीय व ४०० मी. अडथळा शर्यतीमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या स्पर्धेमध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची तीन, व्दितीय नऊ व तृतीय क्रमांकाची सहा अशी एकूण १८ पदके जिंकली आहेत. यापैकी प्रथम व व्दितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. सर्वांना क्रीडा शिक्षक संभाजी जाधव व प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लेकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रभाकर जोशी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्य बेंचप्रेस स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने राज्य बेंचप्रेस स्पर्धा आयोजित केली होती. वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालय, नागरी सेवा सहाय्यक ट्रस्टच्या सभागृहात झालेल्या या स्पर्धेत क्लासिक व इक्वीप या प्रकारात किमान ३००च्या वर स्पर्धकांनी भाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडाप्रेमी आमदार कालिदास कोळंबकर यांच्या हस्ते झाले. अतिशय चुरशीच्या झालेल्या विविध गटातील या स्पर्धेत अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदकविजेते महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेला मैदान बचाव समितीचे भास्कर सावंत उपस्थित होते. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात शासनाने क्रीडा विभागामध्ये विविध पदावर थेट नियुक्त केलेल्या १६ पॉवरलिफ्टिंग खेळाडूंचा विशेष गौरव खेळाडूंचे पालक व प्रशिक्षक यांच्या हस्ते करण्यात आला. नामवंत जेष्ठ खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय माधव आणि शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त रक्षा महाराव (सेवानिवृत्त पोलीस अधिकारी) हजर होते. त्यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, राज्य स्पर्धेतील निवडक खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

**इक्विप स्पर्धेतील किताब विजेते**

सब ज्युनिअर स्ट्राँग मॅन वेदांत कदम (ठाणे जिल्हा), सब ज्युनिअर स्ट्राँग वूमन सानिका जठार (मुंबई जिल्हा), ज्युनिअर स्ट्राँग मॅन अक्षय प्रजापती, ज्युनिअर स्ट्राँग वुमन सेजल मकवाना (उपनगर मुंबई), सीनिअर स्ट्राँग मॅन गणेश तोटे (रायगड), सीनिअर स्ट्राँग वूमन काजल भाकरे (ठाणे), मास्टर १ (४० वर्षावरील) स्ट्राँग मॅन अजिनाथ शेकडे (छत्रपती संभाजीनगर), स्ट्राँग वूमन डॉ. शर्वरी इनामदार (पुणे), मास्टर २ (५९ वर्षावरील) मास्टर स्ट्राँग मॅन मनीष कोंढरा (पुणे).

**क्लासिक स्पर्धा किताब विजेते**

सब ज्युनिअर स्ट्राँग मॅन शेख समीर (पालघर), सब ज्युनिअर स्ट्राँग वूमन नंदिनी उपर (रायगड), ज्युनिअर स्ट्राँग मॅन तन्मय पाटील, ज्युनिअर स्ट्राँग वूमन वैभवी माने (सोलापूर), सीनिअर स्ट्राँग मॅन मयूर शिंदे (पुणे), सीनियर स्ट्राँग वूमन काजल भाकरे (ठाणे), मास्टर १ (४० वर्षावरील) स्ट्राँग मॅन पोनराज नाडर (मुंबई), स्ट्राँग वूमन डॉ. शर्वरी इनामदार (पुणे), मास्टर २ (५० वर्षावरील) स्ट्राँग मॅन सचिन कोचरेकर (ठाणे), स्ट्राँग वूमन गीतांजली दस्तूर (मुंबई).

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत रोहा संघ विजेता

**रोहे : प्रतिनिधी**

अलिबाग (हाशिवरे) विरुद्ध रोहा (मेहेंदळे) जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत अंतिम सामन्यात रोहा संघ दणदणीत विजय मिळवून विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या स्पर्धेत कोएसोच्या रोहा येथील मेहेंदळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुलांची सतत आठ वर्षे चमकदार कामगिरी केली आहे.

गोरेगाव येथील ना.म. जोशी विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या १९ वर्षाखालील वयोगटातील मुलांच्या खो-खोच्या अंतिम सामन्यात मेहेंदळे हायस्कूलच्या मुलांनी अटीतटीच्या सामन्यात दुसऱ्या डावातील उत्कृष्ट संरक्षणाच्या आधारे तीन मिनिटे राखून हाशिवरे संघाचा पराभव करून जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला व ते विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

या स्पर्धेसाठी विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोसे, मार्गदर्शक नारायण पानसरे, के.आर. पाटील, गायकवाड, भोई, परिहार, वाघमारे व विक्रांत शिंदे यांनी मेहनत घेतली

शाळेचे चेअरमन संदीप गांगल, जिल्हा क्रीडा अधिकारी सौ मानकर, स्पर्धा आयोजक श्री. डांगे, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालकवर्ग व माजी विद्यार्थी यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com